
गुरुवार, ९ जून २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३२२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## विमानतळावर मास्क अनिवार्य; नियमावली जारी



**नवी मुंबई** : मागील काही दिवसांत महाराष्ट्रासह देशात कोरोना रुग्णांमध्ये मोठी वाढ झाली आहे. कोरोना विषाणूचा वाढता संसर्ग लक्षात घेता डीजीसीए अर्थातच नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने नवीन नियमावली जारी केली आहे. त्यानुसार आता विमानातून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मास्क वापरणे अनिवार्य आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांवर योग्य ती कारवाई करण्याचा आदेशही डीजीसीएकडून विमानतळ आणि विमान कंपन्यांना देण्यात आला आहे. मास्क घालण्यासह कोविड-१९च्या इतर नियमांचे काटेकोर पालन करावे, असे संबंधित आदेशात म्हटले आहे तसेच विमानतळ परिसरात आणि विमान प्रवासात मास्क घालण्यास नकार देणाऱ्या किंवा कोविड-१९ प्रोटोकॉलचे उल्लंघन करणाऱ्या प्रवाशांवर कारवाई करण्याचे आदेश विमान कंपन्यांना देण्यात आले आहेत.

अंतरंग
जुगार अड्ड्यावर धाड; गुन्हा मात्र कामगारांवर/२
पनवेलमध्ये सेवा सुशासन आणि गरीब कल्याणपर्व/३
खेलो इंडिया : ठाण्याच्या संयुक्ता काळेचा 'सुवर्णपंच'/८

# बारावीत यंदाही कोकणची बाजी

## राज्याचा निकाल ९४.२२ टक्के; मुली ठरल्या सरस

### विभागनिहाय टक्केवारी

कोकण : ९७.२१
नागपूर : ९६.५२
अमरावती : ९६.३४
लातूर : ९५.२५
कोल्हापूर : ९५.०७
नाशिक : ९५.०३
औरंगाबाद : ९४.९७
पुणे : ९३.६१
मुंबई : ९०.९१

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज्याचा बारावीचा निकाल ९४.२२ टक्के इतका लागला आहे. या परीक्षेत दरवर्षीप्रमाणे यंदाही कोकण विभाग अव्वल ठरला आहे, तर मुंबई विभागाचा निकाल सर्वांत कमी लागला आहे.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता बारावीचा निकाल जाहीर केला आहे. निकालात मुलींनी बाजी मारली आहे. मुलींचा निकाल ९५.३५ टक्के, तर मुलांचा ९३.२९ टक्के लागला आहे.

यंदा एकूण १४,४९,६६४ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. यापैकी १४,३९,७३१ जण प्रविष्ट झाले आणि त्यातून १३,५६,६०४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळा-कनिष्ठ महाविद्यालयातर्फे १७ जूनला गुणपत्रिका दिल्या जाणार आहेत.


(संग्रहित छायाचित्र)

### मुंबई विभागात रायगड अव्वल

**अलिबाग** : बारावीच्या परीक्षेत रायगड जिल्ह्याचा निकाल ९३.११ टक्के लागला असून यंदा रायगडने मुंबई विभागात अव्वल स्थान मिळवले आहे. जिल्ह्यात सुधागड तालुक्याचा निकाल सर्वाधिक ९८.२१ टक्के, तर पोलादपूर तालुक्याचा सर्वांत कमी ७१.८५ टक्के लागला आहे. याशिवाय म्हसळा ९८.१० टक्के, पनवेल ९७.४७ टक्के, अलिबाग ९६.५३ टक्के, श्रीवर्धन ९५.४१ टक्के, तळा ९५.३३ टक्के, माणगाव ९५.०९ टक्के, पेण ९४.४७ टक्के, उरण ९२.५९ टक्के, रोहा ९१.७० टक्के, महाड ९०.८७ टक्के, कर्जत ८९.६५ टक्के, खालापूर ७७.७४ टक्के, मुरूड ७४.५६ टक्के असा निकाल लागला आहे.

(सविस्तर वृत्त पान ५ वर..)

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

**खारघर** : बारावीच्या परीक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे.

या विद्यालयातून विज्ञान शाखेमधून आकांशा लालमन गुप्ता (९५%) प्रथम, सैमा युनूस शेख (८४.१७%) द्वितीय व यासिर इम्रान डिवदे (७८.६७%) तृतीय आला, तर वाणिज्य शाखेतून भावना दिनेश रावारिया (९१%) प्रथम, रजनिश संजीव वर्मा (८८.५०%) द्वितीय व अब्दुल्लाहक शामशुद्दीन (८७.५०%) तृतीय आला.

या धवल यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच प्राचार्य, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थी** | **वाणिज्य शाखेतील गुणवंत विद्यार्थी**



आकांशा लालमन गुप्ता (९५%) | सैमा युनूस शेख (८४.१७%) | यासिर इम्रान डिवदे (७८.६७%) | भावना दिनेश रावारिया (९१%) | रजनिश संजीव वर्मा (८८.५०%) | अब्दुल्लाहक शामशुद्दीन (८७.५०%)

**लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज, मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम घरत ज्युनिअर कॉलेजचा निकालही १०० टक्के/३ वर..**

# १७ पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ

## शेतकऱ्यांसाठी मोदी सरकारचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मोदी सरकारने देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना मोठी भेट दिली आहे. एकूण १७ पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी (दि. ८) हा निर्णय घेतला. यानुसार २०२२-२३ पीक वर्षासाठी १७ पिकांचा एमएसपी १०० रुपयांनी वाढवून २,०४० रुपये प्रति क्विंटल करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे इतर अनेक खरीप पिकांवरही एमएसपी वाढवण्यात आला आहे.

याविषयी माहिती देताना केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, या वेळी सर्व १४ खरीप पिके आणि त्यांच्या वाणांसह १७ पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अनेक पावले उचलण्यात आली आहेत.

ना. अनुराग ठाकूर पुढे म्हणाले की, आजच्या बैठकीत खरीप पिकांसाठी एमएसपी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. गेल्या वर्षी जसे ठरवण्यात आले होते की, खर्च अधिक ५० टक्के तो निर्णय आम्ही सातत्याने पुढे नेला आहे. किसान सन्मान निधी अंतर्गत दोन लाख कोटी रुपये खात्यात गेले आहेत. खतावर दोन लाख दहा हजार कोटींचे अनुदान देण्यात आले आहे.

भात (सामान्य), भात (ए ग्रेड), ज्वारी (हायब्रीड), ज्वारी (मालदांडी), बाजरी, नाचणी, मका, तूर, मूग, उडीद, भुईमूग, सूर्यफूल बियाणे, सोयाबीन, तीळ, रामतीळ, कापूस (मध्यम फायबर), कापूस (लांब फायबर) या पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्यात आली आहे.

किमान आधारभूत किंमत ही किमान किंमत आहे, ज्यावर सरकार शेतकऱ्यांकडून पिकांची खरेदी करते. सरकार शेतकऱ्याला त्याच्याकडून खरेदी केलेल्या पिकावर जे पैसे देते ते एमएसपी आहे. पिकाची एमएसपी निश्चित केली जाते, जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांच्या पिकासाठी कोणत्याही परिस्थितीत वाजवी किमान किंमत मिळेल.



### कृषी क्षेत्रासाठी विविध पावले

केंद्र सरकारने अनेक पिकांना एमएसपीच्या कक्षेत आणले आहे. बियाण्यापासून सिंचनापर्यंत प्रत्येक टप्प्यावर सक्षमीकरण झाले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी कृषी क्षेत्रात अनेक पावले उचलली गेली. कृषी अर्थसंकल्प एक लाख २६ हजार कोटी रुपयांवर गेला आहे. मोदी सरकारच्या निर्णयांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे, असे केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी सांगितले. किसान सन्मान निधी अंतर्गत एकूण दोन लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात गेले, तर खतावर दोन लाख १० हजार कोटींचे अनुदान देण्यात आले, असेही त्यांनी नमूद केले.

## निवडक

### मुसेवाला हत्येप्रकरणी संशयित सौरभ महाकाळला अटक

**पुणे** : पंजाबी गायक, काँग्रेस नेता सिद्धू मुसेवाला याच्या हत्येप्रकरणी संशयित आरोपी सौरभ महाकाळ याला पोलिसांनी पुणे जिल्ह्यातून ताब्यात घेतले आहे. अटक करून त्याला न्यायालयात हजर केले असता २० जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मोक्का कारवाईनंतर पसार झालेला आरोपी महाकाळ हा लॉरेन्स बिष्णोई टोळीच्या संपर्कात होता.

### भारतीय क्रिकेटपटू मिताली राज निवृत्त

**नवी दिल्ली** : भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार आणि दिग्गज खेळाडू मिताली राजने सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. सोशल मीडियावरून तिने याबाबत माहिती दिली. मितालीच्या नावावर अनेक विक्रम आहेत. निवृत्ती स्वीकारताना तिने संघातील सहकारी, बीसीसीआयचे पदाधिकारी आणि चाहत्यांचे आभार मानले आहेत.

(सविस्तर वृत्त पान ८ वर..)

## विधान परिषद निवडणुकीसाठी भाजप उमेदवारांची यादी जाहीर

### श्रीकांत भारतीय, उमा खापरेंना संधी

**मुंबई : प्रतिनिधी**



भाजपकडून विधान परिषदेसाठी उमेदवारी यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, माजी मंत्री राम शिंदे, आमदार प्रसाद लाड, प्रदेश सरचिटणीस श्रीकांत भारतीय आणि महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष उमा खापरे यांचा समावेश आहे. भाजपने भारतीय आणि खापरे यांच्या रूपाने नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.

श्रीकांत भारतीय हे भाजपचे प्रदेश सरचिटणीस असून एक अभ्यासू नेता म्हणून त्यांची ओळख आहे. याशिवाय ते भाजप किसान मोर्चाचे राष्ट्रीय सदस्यही आहेत. २०१४च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी भाजपच्या वॉर रूमच्या प्रमुखपदाची धुरादेखील सांभाळलेली आहे.

उमा खापरे या भाजपच्या आक्रमक नेत्या म्हणून ओळखल्या जातात. त्या महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष आहेत. भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या समर्थक म्हणूनही त्यांची ओळख आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेत नगरसेविका आणि विरोधी पक्षनेत्या म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळलेली आहे.

दरम्यान, भाजपने उमेदवारी यादी जाहीर केल्यानंतर काँग्रेसकडूनही त्यांचे उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. काँग्रेसने विधान परिषद निवडणुकीसाठी भाई जगताप आणि चंद्रकांत हंडोरे यांना उमेदवारी दिली आहे.

राज्यसभेचा धुरळा खाली बसत नाही तोच विधान परिषदेची निवडणूक येत्या २० तारखेला होत आहे. १० जागांसाठी ही निवडणूक होत आहे. अनेक दिग्गज नेते विधान परिषदेतून निवृत्त होत आहेत.

**भाजपच्या चार उमेदवारांचे अर्ज दाखल/२**





**पनवेल : तालुक्यातील शिवाजीनगर गावची वार्षिक श्री सत्यनारायण महापूजा मंगळवारी राधा-कृष्ण मंदिरात झाली. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तेथे जाऊन दर्शन घेतले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, शिवाजीनगर गाव अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, कामगार नेते किशोर पाटील, सुहास भगत, शिरीष कडू यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.**

## पनवेल मनपा इंग्रजी माध्यम शाळेच्या ज्युनिअर केजीची प्रवेश प्रक्रिया सुरू

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३पासून इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू होत आहे. या शाळेच्या ज्युनिअर केजीच्या वर्गामध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. विशेष म्हणजे महापालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षण मोफत असणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी १५ जूनपर्यंत आपल्या पाल्यांचा प्रवेश निश्चित करण्यासाठी प्रवेश अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ज्युनिअर केजीचा वर्ग यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आला असून या वर्गातील विद्यार्थ्यांची क्षमता ४० असणार आहे. पनवेल मनपा इंग्रजी शाळेत तीन किमीच्या परिसरातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेमध्ये प्राधान्य राहील. प्रवेश अर्जही मोफत आहेत. प्रवेश अर्ज भरताना बालकाचे जन्म प्रमाणपत्र आवश्यक आहे तसेच रहिवासी पुरावा म्हणून आधार कार्ड, पालकांचे पासपोर्ट, मतदार ओळखपत्र, वीज बिल, टेलिफोन बिल, पाणीपट्टी, वाहन चालविण्याचा परवाना, रेशनिंग कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबूक, भाडे तत्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडे करारनाम्याची प्रत यापैकी कोणतेही एक कागदपत्र पुरावा म्हणून घेण्यात येईल.

ज्युनियर केजीमध्ये प्रवेश घ्यावयाच्या बालकाचा जन्म १ जुलै २०१७ ते ३१ डिसेंबर २०१८ दरम्यान झालेला असावा. प्रवेश अर्ज तसेच अधिक माहितीसाठी अनिता दसवते (९९२०२१५६४७), प्राजक्ता महाडिक (९५९४०९१०५०) यांच्याशी संपर्क साधावा.

- ◆ **प्रवेश अर्ज भरण्याचा सुरुवातीचा दिनांक : ९ जून २०२२ सकाळी १० वाजल्यापासून.**
- ◆ **प्रवेश अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक : १५ जून २०२२ सायंकाळी ६ वाजेपर्यंत.**
- ◆ **लॉटरीचा दिनांक व वेळ : २३ जून २०२२ दुपारी ३ वाजता.**
- ◆ **प्रवेश अर्ज मिळण्याचे ठिकाण : पीर करमअली शाह उर्दू शाळा क्र. १०, पाटकर वाडा, देवाळे तलावासमोर, महापालिका मुख्यालयाजवळ पनवेल.**

खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा

## पेणच्या आर्यन पाटीलला रौप्यपदक



**पेण : रामप्रहर वृत्त**

हरियाणातील पंचकुला येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत पेण तालुक्यातील रावे येथील खेळाडू आर्यन अरुण पाटील याने उंच उडीत रौप्यपदक पटकाविले.

अ‍ॅथलेटिक्समध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. यात रायगडच्या आर्यन पाटीलने २.०४ मीटर उंच उडी मारून रौप्यपदक जिंकले. याबद्दल त्याचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## पनवेल महापालिकेत दोन महिन्यांमध्ये २२ कोटी ९३७ रुपये मालमत्ता कर जमा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात आतापर्यंत दोन महिन्यांत २२ कोटी ९३७ रुपये मालमत्ता कर जमा झाला आहे. मागील आर्थिक वर्षात मार्चपर्यंत १०८ कोटी रुपये मालमत्ता कर जमा झाला होता. महापालिकेला वर्षाला २१० कोटी रुपये मालमत्ता कर जमा होणे अपेक्षित आहे.

पनवेल महापालिका हद्दीत तीन लाख ३९ हजार मालमत्ताधारक आहे. त्यापैकी दोन लाख ५० हजार निवासी मालमत्ताधारक आहेत. त्यांनी महापालिकेचा मालमत्ता कर भरल्यास त्यांना कुटुंब अपघाती विमा योजनेचे संरक्षण देण्यात येणार आहे. यासाठी कुटुंबातील एक किंवा जास्त व्यक्तींच्या नावावर मालमत्ता असणे आवश्यक आहे. मालमत्ता कर भरण्यासाठी विविध ई-सुविधा देण्यात आल्या आहेत. क्युआर कोडबरोबरच पीएमसी टॅक्स अ‍ॅप हे मोबाइल अ‍ॅप विकसित करण्यात आले आहे.

महापालिकेने मालमत्ताधारकांना त्यांनी १ एप्रिल ते ३१ मेपर्यंत कर भरल्यास १०० टक्के दंड माफ करण्याची सवलत दिली होती. या सवलतीचा १९४० मालमत्ताधारकांनी फायदा घेतला असून त्यांनी २२ कोटी ९३७ लाख मालमत्ता कर भरला आहे. ३१ जुलैपर्यंत ७५ टक्के दंड माफ असल्याने या सवलतीचा जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी फायदा घेऊन कराचा भरणा करण्याचे आवाहन उपायुक्त गणेश शेट्ये यांनी केले आहे.

सैन्यात काम केलेल्या मालमत्ताधारकांना महापालिकेच्या एकूण ३८ टक्के करापैकी २० टक्के असलेल्या सामान्य करात आठ टक्के सूट दिली जाते. नवीन पनवेलमधील प्रजापती सोसायटीतील नेव्हीतून निवृत्त झालेले वृद्ध गृहस्थ उपायुक्त गणेश शेट्ये यांच्याकडे आपले ओळखपत्र घेऊन आले होते. उपायुक्तांनी त्यांची कागदपत्रे स्वतः पूर्ण करून संबंधित क्लार्कला बोलावून यांनी आपल्या देशाची सेवा केली आहे. त्यांचे काम ताबडतोब करा सांगितले. त्यामुळे ते खुश झाले.



### अशी आहे मालमत्ता कर शास्ती फी सवलत

१.४.२०२२ ते ३१.५.२०२२ : १००%
१.६.२०२२ ते ३१.७.२०२२ : ७५%
१.८.२०२२ ते ३०.९.२०२२ : ५०%
१.१०.२०२२ ते ३१.१२.२०२२ : २५%

## निवडक

### तरुणावर प्राणघातक हल्ला

**पनवेल :** खारघरमधून मोटरसायकलवरून तळोजा येथे जाणाऱ्या सिद्धेश यशवंत काळे (वय ३०) हून याच्यावर स्कूटीवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोराने मिरचीची पावडर टाकून चाकूने अनेक वार केले. खारघरमध्ये ही घटना घडली. यामध्ये मुले सिद्धेश गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर खारघर पोलिसांनी अज्ञात हल्लेखोरावर गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. सिद्धेश तळोजा फेज – २ मध्ये पत्नीसह राहण्यास असून नवी मुंबई महापालिकेच्या वाशी येथील ईटीसी केंद्रात वायरमन म्हणून कामाला आहे.

### चरस विक्रीप्रकरणी एकाला अटक

**पनवेल :** चरस विक्रीसाठी आलेल्या एकाला गुन्हे शाखा पोलिसांनी अटक केली आहे. अमली पदार्थ विरोधी पथकाने तळोजा येथे सापळा रचून ही कारवाई केली आहे. त्यामध्ये एकाला अटक केली असून त्याच्याकडून ६० हजार रुपये किमतीचा चरस जप्त करण्यात आला आहे. संचयन ऊर्फ जय गुप्ता असे अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. तो तळोजा परिसरात राहणारा आहे. तळोजा परिसरात काही जण अमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक बाशिअली सय्यद यांच्या पथकाने सापळा रचला. या वेळी जय गुप्ता हा तेथे आला असता त्याला ताब्यात घेण्यात आले. झडतीत त्याच्याकडे चरस आढळून आला.

### अज्ञाताने केले गाडीचे नुकसान

**पनवेल :** शहरातील नवनाथ नगर झोपडपट्टी येथे उभ्या



करून ठेवलेल्या एका इको गाडीची काचा फोडून गाडीचे मोठे नुकसान केल्याची घटना घडली आहे. त्याचप्रमाणे दोन दिवसांपूर्वी सुद्धा अशाचप्रकारे शहरातील आठ ते दहा गाड्यांचे नुकसान करण्यात आल्याने वाहनमालकांमध्ये भीतीयुक्त वातावरण आहे. नवनाथ नगर झोपडपट्टी येथे राहणाऱ्या जलालबी जाकी शेठ यांच्या पतीच्या नावे असलेली इको गाडी (एमएच ४६ झेड ०७७३) नगर झोपडपट्टी येथे उभी ठेवली होती. या वेळी अज्ञात व्यक्तीने गाडीची काच फोडून मोठे नुकसान केल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेलमध्ये सेवा सुशासन आणि गरीब कल्याणपर्व

## ■ भाजप शहराध्यक्ष जयंत पगडे यांनी दिली माहिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारला आठ वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात मोदी सरकारच्या माध्यमातून विकासाच्या विविध योजना राबवून नागरिकांना त्याचा लाभ देण्यात आला. सरकारच्या या योजनांची माहिती जास्तीत जास्त सर्वसामान्यांपर्यंत पोहचावी याकरिता भाजपच्या वतीने सेवा सुशासन आणि गरीब कल्याणपर्व कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत मंगळवारी (दि. ७) पनवेलमधील एचओसी वसाहतीजवळील आणि सिमरन मोटर्सजवळील आदिवासी वाडीत योजनांची माहिती देण्यात आली.

या वेळी भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, उपमहापौर सीताताई पाटील, सभापती हेमलता म्हात्रे, शहर सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील, सोशल मीडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, वाहतूक सेल शहर संयोजक के. के. म्हात्रे, ओबीसी मोर्चाचे शहर सरचिटणीस प्रसाद म्हात्रे, युवा मोर्चा शहर उपाध्यक्ष आकाश डोंगरे, प्रभाग १८चे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, प्रभाग १४चे अध्यक्ष गणेश म्हात्रे, प्रसाद कंधारे, विजय डिसोझा, सर्वेश पाटील, नरेंद्र सोनवणे, सुरेश पाटील, हेमंत म्हात्रे, उज्ज्वला पाटील, अनुसूचित जमाती मोर्चाचे महेश वाघे आदी उपस्थित होते.

नागरिकांना पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरे मिळणार आहेत. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालये, अन्न सुरक्षा योजनेंतर्गत मोफत अन्नधान्य मिळत आहे. उज्ज्वला योजनेमार्फत मोफत गॅस कनेक्शन तसेच ई–श्रम कार्ड योजनेचा लाभ मिळाला आहे. यांसारख्या विविध योजनांची माहिती सेवा सुशासन व गरीब कल्याणपर्व कार्यक्रमांतर्गत समाजातील अनुसूचित जमाती (आदिवासी बंधू–भगिनी) व अन्य गरीब लोकांची भेट घेऊन या घटकांपर्यंत पोहचविण्यात आली, जेणेकरून त्यांना या योजनांचा लाभ घेता येऊ शकतो.

# बारावीच्या परीक्षेत कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेजचा १०० टक्के निकाल

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम आणि ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये सायन्स विभागामध्ये इक्रा अब्दुलगनी शेख हिने ८१.८० टक्के तर कॉमर्स विभागात ८६ टक्के गुण प्राप्त करून तन्नु रमेश कुमार साहु हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम आणि ज्युनिअर कॉलेजच्या सायन्स विभागातून बारावीच्या परिक्षेसाठी एकूण १४१ विद्यार्थी बसले असून सर्व विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत. या निकालात सायन्स विभागातून ८१.८० टक्के गुण प्राप्त करुन इक्रा अब्दुलगनी शेख हिने प्रथम, शंभावी ठाकूर हीने ७९.३० टक्के मिळवत द्वितीय तर स्नेहल तिवारी हीने ७८.३० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच कॉमर्स विभागात तन्नू साहू हिने ८९ टक्के गुण मिळवत प्रथम, ८५.३० टक्के मिळवत पायल भट्ट द्विियीय तर ८२.३० टक्के गुण मिळवत मीत सकपाल तृतीय आला आहे. सर्व उतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले आहे.

### टीएनजी कॉलेजचेही धवल यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बारावी बोर्डाच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात आल्या असून याचा निकाल बुधवारी (दि. ८) जाहीर झाला. या परिक्षेमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला आहे. त्याद्दल संस्थेचे चेअरमन तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम घरत ज्युनियर कॉलेज मधून राजकुमार म्हात्रे याने ७५.१७ टक्के गुण मिळवत प्रथम, केया ढवळे हीने ७३.५० टक्के मिळवत द्वितीय तर ७१ टक्के गुण प्राप्त करून हर्ष ठाकूर याने तृतीय क्रमांक पटकावला आहे. बारावीच्या परिक्षांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# सराईत चोरटा ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरात उभ्या ठेवलेल्या मोटरसायकली चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून हजारो रुपये किमतीच्या चार मोटरसायकली हस्तगत केल्या आहेत.



पनवेल शहर परिसरात गेल्या काही महिन्यांपासून मोटरसायकल चोरी जाण्याचे प्रमाण वाढले होते. या संदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार रवींद्र राऊत, नाईक परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, विनोद देशमुख, रवींद्र पारधी, शिपाई विवेक पारासुर, प्रसाद घरत आदींच्या पथकाने आरोपीचा शोध घेतला. यामध्ये सराईत मोटारसायकल चोर दिनेश रामदास जाधव (वय ३५ वर्षे, धंदा हमाल काम, पनवेल) याची माहिती मिळालीम त्यानुसार सापळा रचून या आरोपीला ताब्यात घेण्यात आले. पनवेल परिसरातून चोरलेल्या ४ मोटरसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

# सीकेटी महाविद्यालयाचा ९८.६४ टक्के, तर गव्हाण महाविद्यालयाचा ९८.५७ टक्के निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयाचा ९८.६४ टक्के निकाल लागला आहे. त्याद्दल संस्थेचे चेअरमन तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

सीकेटी विद्यालयाच्या सायन्स विभागातून ९१.३३ टक्के गुण मिळवत वेदांत गायकर याने प्रथम, ८६ टक्के गुण मिळवत निरंजन कुलकर्णी द्वितीय व ८५.८३ टक्के गुण मिळवत सिद्धी म्हसकर तृतीय आली आहे. कॉमर्स विभागात ९१.६७ टक्के गुण मिळवत इशा सुपे प्रथम, ९०.३३ टक्के गुण मिळवत श्रुती सिंग द्वितीय व ८८.५० टक्के गुण मिळवत आर्यन मोरे तृतीय आला आहे. तर आर्टस् विभागात ७९.५० गुण मिळवत रोहित सुरवसे प्रथम, ७८.३३ टक्के मिळवत संस्कृती कोळी द्वितीय तर ७७.१७ टक्के गुण मिळवत तन्वी माने तृतीय आली आहे.

बारावीच्या परिक्षांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाइस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव एस. टी. गडदे, सीकेटी विद्यालयाच्या प्राचार्या इंदू घरत यांच्यासह शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.



वेदांत गायकर



निरंजन कुलकर्णी



सिद्धी म्हसकर



ईशा सुपे



श्रुती सिंग



आर्यन मोरे



रोहित सुरवसे



संस्कृती कोळी



तन्वी माने

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनिअर कॉलेजचा एचएससी अर्थात इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा २०२२चा निकाल ९८.५७ टक्के लागला असून कॉमर्स विभागाचा निकाल शंभर टक्के तर कला शाखेचा निकाल ९७.९१ टक्के इतका लागला.

कला शाखेची विद्यार्थिनी प्रज्ञा राजेंद्र चौधरी ही ८५.५० टक्के इतके गुण प्राप्त करून विद्यालयात व कला शाखेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली तर कला शाखेचीच रिद्धी सुभाष कडू हिने ७९ टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. वाणिज्य शाखेतून आकांक्षा ज्ञानेश्वर म्हात्रे हिने ७७ टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात तिसरा आणि वाणिज्य विभागात प्रथम क्रमांक प्राप्त केला.

## ▌कला, वाणिज्य दोन्ही शाखेत मुलींचीच बाजी

### शाखानिहाय प्रथम तीन क्रमांक

***कला शाखा :***

**प्रथम – प्रज्ञा राजेंद्र चौधरी (८२.५० टक्के)**

**द्वितीय – रिद्धी सुभाष कडू (७९ टक्के)**

**तृतीय – कुंता नवनाथ काकडे (७३.१७ टक्के)**

***वाणिज्य शाखा :***

**प्रथम – आकांक्षा ज्ञानेश्वर म्हात्रे (७७ टक्के)**

**द्वितीय – रक्षा एकनाथ कोळी (७५.३३ टक्के)**

**तृतीय – सायली मदन पाटील (६९ टक्के)**



संग्रहीत छायाचित्र

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व विद्यालयाचे आधारस्तंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य आणि विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. यासोबतच त्यांच्या मार्गदर्शकांचेही अभिनंदन केले आहे.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत, विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे, उपमुख्याध्यापक जगन्नाथ जाधव, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे आदींनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.





**पनवेल :** नगरसेवक विकास घरत यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत आणि जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी मनोहर भेंडे, निलेश जोशी, सचीन शिरढोणकर, रवी कडू, जगन कडू, मंगेश भेंडे, मयुर भेंडे, अंकुश कडू, वैभव भोपी, निलेश म्हात्रे, सार्थक कडू, विशाल म्हात्रे, जयराम घरत आदी उपस्थित होते.

# पनवेल महापालिका हद्दीत आढळले कोरोनाचे ८४ नवे रुग्ण

## मास्क लावण्याचे नागरिकांना आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीत कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे. बुधवारी (दि. ८) कोरोना रुग्णांची संख्या ८४ झाल्याने महापालिकेत कर्मचाऱ्यांना मास्क लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनाही मास्क लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पनवेल महापालिका हद्दीत मागील आठवड्यापासून कोरोना रुग्णांची संख्या रोज वाढत आहे. बुधवारी पनवेल महापालिका हद्दीत ८४ तर इतर प्राथमिक केंद्रात ३३ रुग्ण सापडल्याने रायगड जिल्ह्यात एकूण ११७ कोरोना रुग्ण सापडले आहेत. पनवेलमध्ये बुधवारी आढळलेल्या ८४ रुग्णांत ५१ रुग्ण खारघरमधील आहेत. चार कळंबोली, १८



कामोठे, सहा नवीन पनवेल व पाच पनवेलमधील आहेत.

पनवेलमधील कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची लक्षणे सौम्य असल्याने त्यांना दवाखान्यात उपचारासाठी दाखल न करता ते घरीच उपचार घेत आहेत.

महापालिका हद्दीतील एकूण रुग्णाची संख्या २०० पेक्षा जास्त असल्याने महापालिका कर्मचाऱ्यांना मास्क लावण्याच्या सूचना दिल्याचे समजते. नागरिकांना ही सार्वजनिक ठिकाणी फिरताना काळजी घेण्याचे व मास्क लावण्याचे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २२

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. ऑटो क्षेत्रातील सर्वात अधिक किंमतीचा शेअर असलेली कंपनी कोणती?**

***अ.*** मारुती सुझुकी ***आ.*** एमएफआर ***इ.*** बजाज ऑटो ***ई.*** बाळकृष्ण इंडस्ट्रीज

**२. माहिती तंत्रज्ञान म्हणजे आयटी क्षेत्रातील सर्वात अधिक किंमतीचा शेअर असलेली कंपनी कोणती?**

***अ.*** इन्फोसिस ***आ.*** टीसीएस ***इ.*** कोफोर्ज ***ई.*** एल अ‍ॅंड टी इन्फोटेक

**३. मेटल क्षेत्रातील सर्वात अधिक किंमतीचा शेअर असलेली कंपनी कोणती?**

***अ.*** टाटा स्टील ***आ.*** रत्नमनी मेटल्स अ‍ॅंड ट्यूब ***इ.*** हिंदाल्को ***ई.*** जेएसपीएल




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

***...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!***

संपादकीय

# संकटकाळातली कामगिरी

कोविड महासाथीच्या संकटकाळानंतर यावर्षी पहिल्यांदाच बारावीची परीक्षा ऑफलाइन घेण्यात आली. कोविडची तिसरी लाट, अपुरे राहिलेले अभ्यासक्रम, बहुतांशी ऑनलाइन पार पडलेले शिक्षण, त्यानंतर पुन्हा प्रत्यक्ष शाळा-कॉलेजातील शिक्षणाशी जुळवून घेणे या साऱ्यातून विद्यार्थ्यांची भीषण दमछाक झाली होती. मुंबईमध्ये कोविडसंबंधी परिस्थिती अधिकच बिकट होती. ती सावरायला सर्वाधिक वेळही लागला. त्यामुळे मुंबईचा निकाल सर्वात कमी लागला असावा का असा प्रश्न कुणाला पडल्यास त्यात वावगे काही नाही.

**गेल्या काही वर्षांपासून दहावी-बारावीच्या परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवणाऱ्यांमध्ये मुलींचाच समावेश अधिक असतो हे सातत्याने दिसून आले आहे. यंदाच्या बारावीच्या निकालातही हेच चित्र दिसते आहे. बोर्डाच्या परीक्षांच्या निकालांमध्ये मुलींनी घेतलेली आघाडी हा निव्वळ योगायोग म्हणता येणार नाही. नुकताच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा निकालदेखील लागला होता. तेव्हाही मुलींचेच यश डोळ्यात भरणारे होते. महाराष्ट्रात राज्य शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षांचा निकाल बुधवारी जाहीर करण्यात आला. यात अपेक्षेप्रमाणेच निकाल लागले असले तरी यंदा दोन गोष्टी विशेषत: लक्षात घेण्याजोग्या आहेत. पहिली म्हणजे मुलींनी घेतलेली आघाडी आणि दुसरी मुंबई विभागाचा सर्वात कमी लागलेला निकाल. यापैकी पहिली गोष्ट स्वागतार्ह तर दुसरी चिंतेत टाकणारी आहे. यंदाची बारावीची लेखी परीक्षा ही ४ मार्च ते ७ एप्रिल दरम्यान घेण्यात आली होती. राज्यातील सुमारे १४ लाख विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. मागील वर्षी म्हणजे २०२१मध्ये दीर्घ काळ विद्यार्थी-पालकांचा अंत पाहणाऱ्या अनिश्चिततेनंतर दहावी-बारावीच्या बोर्डाच्या ऑफलाइन परीक्षा रद्द करण्यात आल्या होत्या व त्याऐवजी अंतर्गत मूल्यमापन तसेच नववी ते अकरावीच्या गुणांच्या आधारे विशिष्ट सूत्र तयार करून विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यात आला होता. त्या पार्श्वभूमीवर २०२२च्या बोर्डाच्या परीक्षांबाबतही काही काळ संभ्रमाचे वातावरण होतेच. या साऱ्या परिस्थितीतही हुशार विद्यार्थी एकाग्रचित्ताने परीक्षेची तयारी करू शकत असले तरी सामान्य कुवतीच्या विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या पालकांसाठी मात्र ही अग्निपरीक्षाच होती. त्यात राज्यातील महाविकास आघाडीच्या सरकारचे धोरण सर्वच बाबतीत सतत तळ्यात-मळ्यात करणारे. शिक्षणाच्या आघाडीवर तर त्यांनी संपूर्ण कोविड संकटकाळात भलताच गोंधळ घातला. प्रत्येक गोष्टीकरिता केंद्र सरकारच्या निर्णयक्षमतेवर विसंबून राहणे एवढीच कामगिरी त्यांनी पार पाडली. अर्थातच या साऱ्याचा एकत्रित परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर झाला असावा. सर्व प्रकारचा ताण, दबाव सोसूनही मेहनतीने उत्तम कामगिरी करण्याची क्षमता मुलींमध्ये दिसून येते असा सूर गेली काही वर्षे शिक्षणक्षेत्राशी संबंधित तज्ज्ञमंडळी लावत आहेत. मुळात मुलींवर अभ्यासाखेरीज इतर कामांचा ताण असतो. त्यामुळे वेळ वाया न घालवता जबाबदारीने अभ्यास करण्याची सवय त्यांना लागते. मुलींना शिक्षणाकरिता प्रोत्साहन देणाऱ्या केंद्र सरकारच्या बचत योजनांचाही समाजमनावर अप्रत्यक्ष परिणाम हळूहळू होतो आहे. मुलींच्या शिक्षणाबाबत पालक सकारात्मक होत चालले आहेत. या साऱ्याच्या परिणामातूनच प्रत्येक स्तरावरील परीक्षेत मुलींनी बाजी मारल्याचे दिसते आहे. बारावीच्या परीक्षेनंतर कारकीर्दीच्या दिशेने घेतल्या जाणाऱ्या शिक्षणाची सुरूवात होते. खरे विश्व विद्यार्थ्यांसाठी खुले होते. या पुढील वाटचालीसाठी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा आणि ज्यांना अपेक्षित यश मिळाले नसेल त्यांनाही नव्या उमेदीने तयारी करण्यासाठी शुभेच्छा.**

# पोलादपूरच्या पतसंस्थेचा चौकशी अहवाल बासनात!



खबरबात
शैलेश पालकर

पोलादपूर तालुक्यात अनेक नॉन बँकिंग सेव्हींग्ज, फायनान्स संस्थांनी गेल्या दशकात आर्थिक लूट करून गाशा गुंडाळला असताना स्थानिक पतसंस्थांनीदेखील ठेवीदारांची अतोनात लूट केल्याच्या घटना झाल्या. या पतसंस्था आणि नॉनबँकिंग संस्थांविरोधातील ठेवीदार आणि अल्पबचतदारांचा दबलेला सूर संबंधित पतसंस्थांच्या संचालकांच्या राजकीय हितसंबंधांमुळे तसेच वेळोवेळी ठेवी-पैसा परत देण्याच्या भूलथापांमुळे सरकारपर्यंत पोहोचलाच नाही. परिणामी हजारो ठेवीदारांच्या कोट्यावधी रुपयांच्या ठेवी संचालकांनी हितसंबंधात कर्जपुरवठा करून बुडविल्याने अवसायानात निघालेल्या पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्थेबाबतचा प्राधिकृत अधिकाऱ्यांचा चौकशी अहवाल वर्षभरानंतरही अद्याप कृतीत आलेला नाही.

सात वर्षांपूर्वी २००६-०७ ते २००९-१० या कालावधीतील वैधानिक लेखा परिक्षण अहवालात गंभीर स्वरूपाचे दोष आढळून आले होते. अशा अवस्थेतच ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळण्याकामी आशा निर्माण केली होती. यानंतर या पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध लावून जुन्या संचालक मंडळाने ठेवीदारांच्या रक्कमा परत करण्याच्या जबाबदारीतून स्वत:ची सुटका करण्याचा प्रयत्न केला आणि पतसंस्थेसंदर्भात दाद मागणाऱ्यांविरोधात वर्तन सुरू केले.

दरम्यान, पतसंस्थेच्या काही संचालकांनी राजकीय कोलांट उड्यासोबत सामाजिक गदारोळ उठवून ठेवीदारांसह त्यांना सहकार्य करू शकतील, अशा सर्वांचाच आवाज दाबण्यात यश मिळविले. ठेवीदारांच्या रक्कमांच्या परताव्यासाठीचे प्रयत्न खुंटले असताना संचालकांनी राजकीय सलोखा साधून कार्यवाहीवर अंकूश निर्माण केला. यात अनेक संचालक नाममात्र होते. काही संचालकांनी 'हम तो डुबेंगे सनम, लेकिन तुम्हेभी साथ लेके,' असा पवित्रा घेतल्याने विभिन्न राजकीय व सामाजिक व्यासपिठावरचे नेते अशा संचालकांच्या पवित्र्यासमोर हतबल होऊन पतसंस्थेतील ठेवीदारांच्या अहिताबाबत निमूटपणे एकाच व्यासपिठावर येत असल्याचे दृश्य दिसल्याने ठेवीदारांनी पुरत्या आशा सोडल्या.

अशातच, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ नुसार विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करीत ही पतसंस्था अवसायानात काढण्यात आली आणि कमळ नागरी सहकारी पतसंस्था, अलिबाग यांनी प्रशासक म्हणून नियुक्ती स्विकारली. प्रशासक आल्यानंतर अल्पबचतदारांच्या रक्कमांचा परतावा करण्याचे काम सुरू झाले. मात्र, कमी ठेवी आणि मोठ्या ठेवींच्या रक्कमांचा परतावा होण्यासाठी कर्जदारांकडून मोठ्या प्रमाणात वसुली करण्याकामी बेकायदेशीर कागदपत्रांचा अडसर प्रशासक पतसंस्थेला मोठ्या प्रमाणात झाल्याने ठेवीदार रक्कमांच्या परताव्यापासून वंचित राहिले.

ठेवीदारांना १० हजारांच्याखाली आणि ५० हजारापर्यंत अशा दोन टप्प्यांत ठेवी मिळण्याची मागणी थोर समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्य सरकारकडे केली होती. त्यानुसार तत्कालीन मुख्यमंत्री यांनी पहिल्या टप्प्यातील ठेवीदारांना ठेवी परताव्यासाठी २०० कोटी रूपयांची तरतूद करण्यास मान्यता दिली होती. या पार्श्वभूमीवर पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्थेतील ठेवीदारांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर, अवसायानात निघालेल्या पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्थेची सहायक निबंधक सहकारी संस्था महाडच्या आदेशानुसार सहायक निबंधक सहकारी संस्था कर्जत यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. या प्राधिकृत चौकशी अधिकाऱ्यांनी पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्थेचे संचालक आणि कर्मचारीवर्ग जबाबदार धरून केलेल्या चौकशीअंती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे कलम ७२-३ नुसार आरोपपत्रही बजावण्यात आले आणि ७२-४ अन्वये यातील सर्व संचालक आणि कर्मचारी यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पाचारण करण्यात आले. यावेळी चेअरमन डॉ. प्रवीण मेहता यांनी कोकणभूवन येथील विभागीय सहकार सहनिबंधक यांच्याकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०२ नुसार याचिका दाखल केल्यानंतर 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचे आदेश ९ फेब्रुवारी २०११ रोजी विभागीय सहकार सहनिबंधक यांनी दिल्याने ही परिस्थिती कायम राहून ठेवीदार आणि बचतदारांच्या रक्कमांचा परतावा मिळण्याकामी खीळ बसली.

१६ ऑगस्ट २०13 रोजी विभागीय सहकार सहनिबंधक यांनी दिलेले 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचे आदेश मागे घेण्यात येऊन पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्थेचे संचालक आणि कर्मचारीवर्ग यांना लेखी व तोंडी म्हणणे असल्यास दाखल करण्याच्या नोटीसा बजावण्यात येऊन त्यानुसार नोंद घेत तयार करण्यात आलेला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ नुसार प्राधिकृत चौकशी अधिकाऱ्यांचा अहवाल २१ फेब्रुवारी २०१४ रोजी तयार करण्यात आला. आजमितीस या अहवालावर वर्षभर कोणतीही कार्यवाही न झाल्याने आता पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्थेचे संचालक आणि कर्मचारीवर्ग यांच्यावर निश्चित करण्यात आलेल्या जबाबदार रक्कमेची वसूली होऊन ठेवीदार आणि बचतदारांच्या रक्कमांचे परतावे कधी मिळतील, याची तालुक्यातील गुंतवणूकदार प्रतीक्षा करीत आहेत.

पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्था अवसायानात निघाल्यानंतर ठेवीदारांचे भवितव्य अंधारातच राहणार असल्याचे आतापर्यंतच्या सरकारी कामकाजावरून स्पष्ट झाले असले तरी या पतसंस्थेच्या प्राधिकृत चौकशी अधिकाऱ्यांच्या अहवालाचे काय होणार? हा प्रश्न आजमितीस वर्षभर अनुत्तरीतच आहे. दरम्यानच्या काळात पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्थेच्या काही संचालकांचे निधन झाले असून काहिंचा मालमत्ता विकण्याचा सपाटा अद्याप सुरू आहे. प्रत्येक संचालक आणि कर्मचाऱ्यावर संस्थेच्या तोट्याची तसेच ठेवीदारांच्या बुडीत रक्कमांच्या परताव्यापोटी समान रक्कम निश्चित करण्यात आली आहे. मात्र, ही रक्कम वसूल करण्याकामी संबंधित संचालक, त्यांचे वारसदार आणि कर्मचाऱ्यांकडे मालमत्ताच शिल्लक न राहिल्याने या चौकशी अहवालावरील निर्णय व कारवाई करण्यात जेवढा विलंब तेवढी मोकळीक संबधित संचालक आणि कर्मचाऱ्यांना मिळणार आहे. यामुळे पोलादपूरकर ठेवीदार किमान एक कोटी रूपयांच्या ठेवींना मुकणार असल्याचे दिसत आहे.

पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्थेच्या थकबाकीदारांकडूनच वार्षिक ताळेबंद तयार करण्याचा प्रकार करणाऱ्या तत्कालीन संचालक मंडळाने कार्यक्षेत्राबाहेरील २० व्यक्तींना १० लाख ८२ हजार ५०० रूपयांची नियमबाह्य कर्ज देऊन ती चौकशी अहवालाच्या तारखेपर्यंत १५ लाख ७६ हजार ५३५ रूपयांची थकीत कर्जे दिसून येतात. २२० कर्जदारांना अपुरी कागदपत्रे, अपुरे तारण, कागदपत्रांची छाननी न करता कर्जवाटप, कर्जफेडीची क्षमता विचारात न घेता कर्जवाटप, वसुलीच्या प्रयत्नांनंतरही वसुल न होणारी कर्ज असे प्रकार झाले आहेत. बुडीत गेल्यावर काही थकबाकीदारांना १०१च्या जप्तीच्या नोटीसा पतसंस्थेकडून बजाविण्यात आल्या होत्या.



## बदलते तंत्रज्ञान



### गुगलला टक्कर देण्यासाठी ॲप्पल आणणार स्वत:चे सर्च इंजिन

गुगलला टक्कर देण्यासाठी ॲप्पल आगामी काळात स्वतः चे सर्च इंजिन लाँच करणार आहे. ॲप्पलने आपल्या बाजूने या सर्च इंजिनबद्दल कोणतीही माहिती दिलेली नाही. तुम्ही स्मार्टफोन, टॅब्लेट आणि लॅपटॉप इत्यादी प्रीमियम स्मार्टफोन ब्रँड्सबद्दल ऐकले असेल, मात्र तुम्हाला माहिती आहे की, आता ॲप्पल एक पूर्णपणे नवीन आणि अनोखी सेवा आणणार आहे. या बातमीनुसार, गुगलला टक्कर देण्यासाठी ॲप्पल आगामी काळात स्वतःचे सर्च इंजिन लाँच करणार आहे. आज आपण याबद्दल अधिक माहिती जाणून घेणार आहोत. आधीच सांगितल्याप्रमाणे, ॲप्पल एका सर्च इंजिनवर काम करत आहे जे गुगलशी स्पर्धा करणार आहे. आजच्या काळात असे एकही सर्च इंजिन नाही, जे गुगलला टक्कर देऊ शकेल. पण आता ॲप्पल गुगलच्या विरोधात उभे ठाकणार असल्याचे दिसते. हे एक नवीन वापरकर्ता-केंद्रित ईआरबी सर्च इंजिन असेल जे जानेवारी २०२३ पर्यंत लाँच केले जाऊ शकते.




ॲप्पलने आपल्या बाजूने या सर्च इंजिनबद्दल कोणतीही माहिती दिलेली नाही, मात्र लीक झालेल्या काही गोष्टींच्या माध्यमातून याबाबतची माहिती समोर आली आहे. टेक ब्लॉगर रॉबर्ट स्कोबल यांनी अनेक आइस प्रोडक्ट्स आणि सेवांचे वर्णन केले आहे, जे ॲप्पल त्यांच्या 'डब्ल्यूडब्ल्यूडीसी २०२३ इव्हेंट'मध्ये लाँच करणार आहे. यामध्ये ॲप्पलच्या नवीन सर्च इंजिनचा समावेश आहे. रॉबर्ट स्कोबल म्हणतात की, त्यांची माहिती स्त्रोत आणि त्यांच्या अंदाजांवर आधारित आहे.

ॲप्पलचे नवीन सर्च इंजिन जानेवारीमध्ये लाँच केले जाऊ शकत असले तरी ॲप्पलचा डब्ल्यूडब्ल्यूडीसी २०२३ इव्हेंट लवकरच येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ॲप्पल या इव्हेंटमध्ये मॅकबुक एअरसोबत नवीन आयओएस १६, आयपॅड ओएस १६, वॉचओएस आणि मॅकओएस १३ सॉफ्टवेअर अपडेट्सदेखील जारी करु शकते. तसेच आयफोन १४ सीरीज देखील या वर्षी सप्टेंबरमध्ये लाँच होणार आहे.

दरम्यान, ॲप्पल जगातील सर्वात मोठी माहिती तंत्रज्ञान आणि महसूल कंपनी आहे आणि सॅमसंग आणि हुअवेईनंतर जगातील तिसऱ्या क्रमांकाचा मोबाईल फोन उत्पादक आहे. फेब्रुवारी २०१५ मध्ये, ॲप्पल ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीची अमूल्य कंपनी बनली. या मुळे ॲप्पल नवनवीन काय आणते याकडे सर्वांचे लक्ष असते.

# सर्जनशील संगीतकार वसंत देसाई



संगीतकार वसंत देसाई हे मूळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील सोनावडे गावचे आहेत. ते मराठी, तसेच अन्य भारतीय चित्रपटांस संगीत देणारे प्रसिद्ध मराठी संगीतकार होते. त्यांनी दिलेल्या चालींमुळे त्यांचे नाव भारतात आणि परदेशांत अजरामर झाले आहे. त्यांचा ९ जून हा जन्मदिवस आहे. त्यांच्या एकूणच कार्याचा घेतलेला हा छोटासा आढावा.

वसंत देसाई यांच्या घरात सांज-सकाळ होणाऱ्या आणि गाव देवळात होणाऱ्या भजन-कीर्तनांमुळे त्यांना संगीतात रुची निर्माण झाली. त्यातच गावात एक सर्कस आली. ती पाहिल्यावर त्यांना सर्कशीत कामे करून लोकांना आनंद व्हावा असे वाटू लागले. त्यासाठी त्यांनी गाव सोडले व ते कोल्हापूरला आले. सर्कशीत काम मिळाले नाही पण प्रभात फिल्म कंपनीत नोकरी मिळाली. त्यावेळी अयोध्येचा राजा या चित्रपटाची निर्मिती होत होती. गोविंदराव टेंबे संगीत देत होते. वसंत देसाईंनी त्यांचा सहाय्यक होण्याचे पत्करले. पुढे कंपनी कोल्हापूरहून पुण्याला आल्यावर वसंत देसाई हेही पुण्यात आले आणि त्यांना मास्तर कृष्णराव व केशवराव भोळे या दोन दिग्गज संगीतकारांचा सहवास लाभला. तेथेच वसंतराव संगीतातले स्वर, तान, फिरकी, आणि रसानुकृत भावदर्शन शिकले. इ.स. १९४३ मध्ये वसंत देसाई यांनी राजकमल कलामंदिराच्या शकुंतला या पहिल्या चित्रपटाला स्वतंत्रपणे संगीत दिले. त्यांची ही संगीत कारकीर्द पुढे तीस वर्षे चालूच राहिली.

जवळजवळ ६५ हिंदी-मराठी चित्रपटांचे ते संगीत दिग्दर्शक होते. चित्रपट-नाटकांशिवाय त्यांनी बालगीतांना आणि समरगीतांनाही संगीत दिले. त्यांच्या 'ए मालिक तेरे बंदे हम' या गीताला पाकिस्तानात राष्ट्रगीताचा दर्जा मिळाला. १९६२ च्या चीन युद्धाच्या वेळचे 'जिंकू किंवा मरू'या ग.दि. माडगुळकरांच्या गीताला त्यांनीच चाल लावली होती. मुंबईतल्या एका अतिउंच इमारतीच्या लिफ्टच्या दारात अडकून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. वसंत देसाई यांनी संगीत दिग्दर्शन दिलेले चित्रपट याप्रमाणे-अमर भूपाळी (मराठी), आशीर्वाद (हिंदी), गुड्डी (हिंदी), गूंज उठी शहनाई (हिंदी), झनक झनक पायल बाजे (हिंदी), दो आँखे बारा हाथ (हिंदी), राम जोशी (मराठी), शकुंतला (हिंदी). वसंत देसाई यांची संगीत असलेली मराठी नाटके या प्रमाणे-गीता गाती ज्ञानेश्वर जय जय गौरीशंकर, देव दीनाघरी धावला, पंडितराज जगन्नाथ, प्रीतिसंगम, शाबास बिरबल, देह देवाचे मंदिर.


वसंत देसाई यांना मिळालेले सन्मान आणि पुरस्कार याप्रमाणे आहेत-सरकारी संगीत दिग्दर्शक, महाराष्ट्र राज्य, पद्मश्री पुरस्कार (१९७१). वसंत देसाई यांनी मराठी, तसेच अन्य भारतीय चित्रपटांस संगीत देणारे मराठी संगीतकार म्हणून चांगलेच नाव मिळविले. 'घन:श्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला', या भूपाळीने आजही महाराष्ट्र रोज सकाळी जागा होतो. 'होनाजी बाळा' चित्रपटातील अवीट गोडीच्या या भूपाळीला चाल संगीत दिग्दर्शक वसंत देसाई यांनी दिलेली आहे.


वसंत देसाई यांनी दिलेल्या चाली आजही रसिकमनांवर कायम कोरल्या गेलेल्या आहेत. संगीत क्षेत्रातील त्यांची प्रदीर्घ कारकीर्द आजही संगीतप्रेमींच्या मनावर राज्य करत आहे.

(साभार : विकिपीडिया)




**मुरुड : सध्या ढगाळ वातावरण असून तुरळक पाऊससुद्धा पडत आहे. अशातच सूर्य ढगांमध्ये लपल्याने अंधुक असा प्रकाश पडला होता. ही स्थिती असताना पर्यटक मुरुड समुद्रकिनारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समुद्रस्नान करण्यात पर्यटक गर्क असल्याचे दिसून येत होते.** (छाया : संजय करडे)



## एकच प्याला, शरीरावर आयुष्यभराचा घाला!

मद्याचे शरीरावर होणारे परिणाम आता सर्वज्ञात आहेत. परंतु चांगली झोप यावी म्हणून काही लोक एक दोन पेग घेऊनच मग झोपी जातात. त्यांना मद्य पिऊन झोपायची सवय लागते. कारण मद्य प्यायल्याने त्यांना लवकर झोप लागते, असा त्यांचा अनुभव असतो. मात्र त्याचे किती घातक परिणाम आहेत, ते भविष्यातच समजून येतात. मद्य पिऊन झोपणाऱ्या लोकांच्या झोपण्याच्या प्रक्रियेवर आणि एकूणच आरोग्यावर मद्याचे फार गंभीर परिणाम होत असतात. मद्यप्राशन करण्याने पटकन झोप लागते आणि ती फार घातक असते. सामान्यतः नैसर्गिकरित्या झोपणाऱ्या व्यक्तीच्या आठ तासाच्या झोपेमध्ये दोन-तीन अवस्था असतात आणि त्या क्रमाक्रमानेच प्राप्त होऊन झोप पूर्ण होत असते.

**मद्यप्राशन गैरसमज-**

दारू प्यायल्याबरोबर गाढ झोप लागते. नंतरचे काही तास तो बेहोशीत असतो. पण ती झोप नसते. शरीराच्या स्नायूंना हलकेपणा येतो. घशातले स्नायू हलके झाल्याने असा माणूस जास्त घोरतो. ती खऱ्या अर्थाने झोप नसते तर बेहोशी आणि जागणे या मधली एक अवस्था असते. शांत झोप लागते हा लोकांचा गैरसमज आहे.

**व्यसनातून सुटण्याचा सोपा मार्ग-**

स्वतःला कार्यमग्न ठेवणे, स्वतःला कुठल्यातरी जबाबदारीत, कार्यात गुंतविण्याने नक्कीच व्यसनमुक्ती होऊ शकते. मात्र त्यासाठी मनाची तयारी हवी. दरम्यान, झोपताना घेतलेले मद्य मूत्रपिंडांवर गंभीर परिणाम करते. मूत्रपिंडासाठी आवश्यक व्हॅसोप्रेसिन हार्मोनची निर्मिती मद्याने बंद होते. शरीरातील पाणी ओढून घेऊन त्याचे शुध्दीकरणाची प्रक्रिया या हार्मोनमुळे संतुलीत राहते. दारूमुळे ही प्रक्रिया असंतुलीत होते आणि लघवीवर परिणाम होतो. दारू पिऊन झोपणारा सकाळी बराच थकलेला दिसतो. शरीरातील पाण्याचा समतोल बिघडल्यामुळे डिहायड्रेशन होते. या मुळे वेळेतच काळजी घेणे गरजेचे आहे.

# मुंबई विभागात रायगड अव्वल

## रायगडचा बारावीचा निकाल ९३.११ टक्के

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल बुधवारी (दि. ८) जाहीर करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील ९३.११ टक्के विद्यार्थी उर्तीर्ण झाले. गेल्या वर्षी जिल्ह्यात ९९.८१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. असे असले तरी यंदा रायगडने मुबई विभागात अव्वल स्थान मिळवले आहे.

मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेसाठी रायगड जिल्ह्यात ३१ हजार ३३५ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी ३१ हजार १०६ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला बसले. त्यातील २८ हजार ९६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्यात यंदाही मुलींनी बाजी मारली. जिल्ह्यातील ९१.६५ टक्के मुले तर ९४.७२ टक्के मुली बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील १४ हजार ७८८ मुली परीक्षेला बसल्या होत्या, त्यातील १४ हजार ०८ मुली उत्तीर्ण झाल्या. म्हणजेच ९४.७२ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. १६ हजार ३१८ मुले बारावीच्या परीक्षेला बसली होती. त्यातील १४ हजार ९५६ मुले उत्तीर्ण झाली. म्हणजेच ९१.६५ टक्के मुले उतीर्ण झाली.

रायगडचा विज्ञान शाखेचा निकाल ९७.८१ टक्के, कला शाखेचा निकाल ८५.०६ टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९३.४१ टक्के तर किमान कौशल्य शाखेचा निकाल ९२.५६ टक्के लागला. सुधागड तालुक्याचा निकाल सर्वाधिक लागला. त्या तालुक्यातील ९८.२१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर पोलादपूर तालुक्याचा सर्वात कमी निकाल लागला आहे. तेथील ७१.८५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

**तालुकानिहाय टक्केवारी**

| | | | |
|---|---|---|---|
| पनवेल | ९७.४७ टक्के, | मुरूड | ७४.५६ टक्के, |
| उरण | ९२.५९ टक्के, | रोहा | ९१.७० टक्के, |
| कर्जत | ९०.२२ टक्के, | माणगांव | ९५.०९ टक्के, |
| खालापूर | ७७.७४ टक्के, | तळा | ९५.३३ टक्के, |
| सुधागड | ९८.२१ टक्के, | श्रीवर्धन | ९५.४१ टक्के, |
| पेण | ९४.४७ टक्के, | म्हसळा | ९८.१० टक्के, |
| अलिबाग | ९६.५३ टक्के, | महाड | ९०.८७ टक्के, |

पोलादपूरचा निकाल ७१.८५ टक्के.

**मुंबई विभागाचा निकाल**

| | | | |
|---|---|---|---|
| ठाणे | ९२.६७ | मुंबई शहर– | ८६.६० |
| रायगड | ९३.११ | मुबई उपनगर (१)– | ८९.३३ |
| पालघर | ९१.७७ | मुंबई उपनगर(२)– | ९१.०० |
| | | एकूण – | ९०.९१ |

## कर्जत तालुक्याचा ९० टक्के निकाल

### अनेक कनिष्ठ महाविद्यालयांनी मिळविले धवल यश

**कर्जत : बातमीदार**

मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल बुधवारी (दि. ८) जाहीर करण्यात आला. त्यात कर्जत तालुक्याचा निकाल ९०.२२ टक्के इतका लागला आहे. तालुक्यातील सहा कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

कर्जत तालुक्यात १५ कनिष्ठ महाविद्यालये आहेत. तालुक्यातील २३०३ विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा देण्यासाठी अर्ज भरले होते, त्यातील ११ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली नव्हती. उर्वरित २२९२ पैकी २०६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कर्जत तालुक्याचा बारावी परीक्षेचा निकाल ९०.२२ टक्के लागला आहे.

कर्जत तालुक्यातील भाऊसाहेब राऊत कनिष्ठ विद्यालय (चिंचवली–डिकसळ), हुतात्मा हिराजी पाटील कनिष्ठ महाविद्यालय (कडाव), शासकीय आश्रमशाळा (पाथरज, चाफेवाडी, भालिवडी) तसेच माध्यमिक विद्यालय–कनिष्ठ महाविद्यालय (गौळवाडी), हाजी लियाकत कनिष्ठ महाविद्यालय, फईम इंग्लिश मीडियम स्कूल कनिष्ठ महाविद्यालय या कनिष्ठ महाविद्यालयांचे निकाल १०० टक्के लागले आहेत. तर नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा, ऑर्चिड कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान आणि कला शाखेचा तसेच भाऊसाहबे राऊत (कशेळे)येथील विद्यालयाच्या कला शाखेचा, भालिवडी आश्रमशाळेच्या विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

**असा आहे सविस्तर निकाल**

*अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला विज्ञान शाखा १२६, कला ९२, वाणिज्य ३८९, नेरळ विद्यामंदिर कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान शाखा १२६, कला १४७, वाणिज्य २८३, श्रमजीवी विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालय कला शाखा ९३, भाऊसाहेब राऊत विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय कशेळे कला शाखा ७८, वाणिज्य शाखा ९२, गौळवाडी माध्यमिक विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय कला शाखा ३३, वाणिज्य शाखा ३३, भाऊसाहेब राऊत चिंचवली डिकसळ कला शाखा ३७, वाणिज्य शाखा ३०, नम्रता आचार्य कनिष्ठ महाविद्यालय शेलू कला शाखा ३५, वाणिज्य शाखा २९, हुतात्मा हिराजी पाटील कनिष्ठ महाविद्यालय कडाव विज्ञान शाखा १४, कला शाखा २६, वाणिज्य शाखा २५, हाजी अली इंग्लिश मिडीयम स्कूल, नेरळ विज्ञान शाखा १८, कला १३, वाणिज्य शाखा ३१, ऑर्चिड कनिष्ठ महाविद्यालय विज्ञान २१, कला शाखा ४, वाणिज्य शाखा १६, फईम कनिष्ठ महाविद्यालय दामत कला शाखा ५, वाणिज्य २, शासकीय आश्रमशाळा पाथरज कला शाखा ६१, शासकीय आश्रमशाळा भालिवडी विज्ञान शाखा १३, कला शाखा ३४, शासकीय आश्रमशाळा पिंगळस चाफेवाडी विज्ञान शाखा १७, कला शाखा ४४, व्होकेशनल स्कुल कर्जत अभिनव प्रशाला केंद्र ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.*

### मोर्बा ज्युनिअर विज्ञान कॉलेजमध्ये

## झररीन फातिमा शेख प्रथम






**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोर्बा ज्युनिअर विज्ञान कॉलेजचा बारावी परीक्षेचा निकाल ९७.९७ टक्के लागला असून शेख झररीन फातिमा शेख चांद हिने ८८.३३ टक्के गुण मिळवून कॉलेजमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. हादीया अन्वर चिलवान आणि अफनान आदम राऊत (८७.३३ टक्के) यांनी द्वितीय तर अवेस जमालुद्दीन राऊत (८५ टक्के) याने कॉलेजमध्ये तृतीय क्रमांक मिळविला आहे.

यावर्षी या कॉलेजचे एकूण ९९ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेला बसले होते. त्यापैकी ९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामध्ये १७ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य संपादन केले असून ४३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ३२ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. सैफुद्दीन धनसे, उपाध्यक्ष डॉ. मोहसीन राऊत, सेक्रेटरी अस्लम राऊत, स्कुल कमिटी चेअरमन डॉ. मैनुद्दीन राऊत, खजिनदार हुसेन हर्णेकर, सहसचिव अ.कादिर हर्णे कर, प्रशासक आसफ पल्लवकर, मुख्याध्यापक खालिद अहमद खान यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मुरूडच्या अंजुमन इस्लाम हायस्कूलमध्ये मनाल उलडे आणि सुबिया कलाब प्रथम

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील अंजुमन इस्लाम हायस्कूलच्या विज्ञान शाखेचा निकाल ९०.६७ टक्के तर कला शाखेचा निकाल ७३.६८टक्के लागला आहे. विज्ञान शाखेचे ११७ विद्यार्थी परीक्षेत बसले होते त्यापैकी १०६ विद्यार्थी पास झाले. त्यात मनाल हिफाजान उलडे (७७.८३ टक्के) हिने प्रथम, सहिमा ए. सलाम मुकादम (७७.६७टक्के) हिने व्दितीय आणि महेक सुहेल गोलंदाज (७२.६७टक्के) हिने तृतीय क्रमांक पटकावला.

अंजुमन इस्लाम हायस्कूलच्या कला शाखेचे ५७ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेला बसले होते. त्यापैकी ४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सुबिया शाहिद कलाब (६७.५० टक्के) हिने प्रथम, झाहिरा इब्राहिम खान (६५.१७ टक्के) हिने व्दितीय तर उजमा रईस बागवान (६०.८३ टक्के) हिने कला शाखेत तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

विज्ञान शाखेत पहिला नंबर मिळविणाऱ्या मनाल हिफाजान उलडे हिचा मुख्याध्यापक जाहिद हुसेन इस्लाईल गोटेकर यांनी अभिनंदन केले. या वेळी संस्थेचे चेअरमन अब्दुल रहिम कबले, हिफाजान उलडे उपस्थित होते.



(छाया : संजय करडे)

## माळी भेरसेत घरफोडी; गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील खानाव ग्रामपंचायत हद्दीमधील माळी भेरसे येथील घराच्या खिडकीतून सोमवारी (दि. ६) मध्यरात्रीच्या प्रवेश करून अज्ञात चोरट्याने कपाटातील रोख रक्कम व सोन्या–चांदीचे दागिने मिळून सुमारे एक लाख ९३ हजाराचा ऐवज चोरून केला.

या प्रकरणी रोशन सदानंद म्हात्रे (वय २९) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## कोर्लई, वांदेलीतून कॉईल्स, अॅल्युमिनियम तारांची झाली चोरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोर्लई व वांदेली येथून तांब्याच्या कॉईल्स व अॅल्युमिनियमच्या तारांची चोरी झाली आहे, या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुरूड तालुक्यात कोर्लई येथील गाला कंपनीच्या कम्पाउंडमधून आणि वांदेली येथील महावितरणच्या ताब्यातील एकूण सुमारे दोन लाख २० हजार रुपये किमंतीची तांब्याची कॉईल्स व अॅल्युमिनियमच्या तारा अज्ञात चोरट्यांनी २ एप्रिल ते २ जून या कालावधीत चोरून नेल्या. या प्रकरणी महावितरणचे अधिकारी मनोज सुरेश चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. संजय हरिश्चंद्र पाटील, श्री. सुधीर हरिश्चंद्र पाटील, श्री. सुरेश हरिश्चंद्र पाटील, श्रीमती ताराबाई हरिश्चंद्र पाटील** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करुन घेण्याकरीता सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**मौजे–बेलोंडाखार, तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४५/३ | ०–१२–४० पो.ख. ०–०१–३० **एकूण ०–१३–७०** | १.६२ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधित व्यक्ती, सरकारी/निमसरकारी/खाजगी संस्था यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०८/०६/२०२२.

**सही/–**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल दूरध्वनी क्र. : २७४५६३०६



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **१) कै. कृष्णा धारराव कदम मयताचे वारस १/१) श्री. दिपक कृष्णा कदम, १/२) श्री. महेश कृष्णा कदम, १/३) श्री. नरेश कृष्णा कदम, २) श्री. रामचंद्र धारराव कदम, ३) श्रीमती उषा अशोक कदम, ४) सौ. उज्वला सुशिल बोरकर, ५) सौ. शुभांगी सुनिल सावंत, ६) सौ. अर्चना नितीन पवार, ७) श्री. सचिन अशोक कदम** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करुन घेण्याकरीता सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**मौजे–कोयनावेळे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड**

| गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २/३ | ०–३८–२० पो.ख. ०–०२–३० **एकूण ०–४०–५०** | २.७५ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधित व्यक्ती, सरकारी/निमसरकारी/खाजगी संस्था यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०८/०६/२०२२.

**सही/–**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल दूरध्वनी क्र. : २७४५६३०६



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E–TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **Rfx No.: 7000023542** **Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-32/2022-2023** RFx E-tender for Providing ITI certified Operator (With Apprenticeship) in Electrician trade for various Substation under EHV (O&M) Division Panvel from 01.07.2022 to 31.03.2023. **Tender amount Rs. 29,61,076/-, EMD amount Rs. 29,611/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **08.06.2022, 18:00 Hrs. to 15.06.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 15.06.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **16.06.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

**Tender fees Rs.500/- + GST**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**



सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना
**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषांगिक कामामुळे स्थलांतरीत होणाऱ्या मौजे उलवे येथील बांधकाम क्र. UL–५००, UL–५००A (संचिका क्र.ULV-ICIG-२४९) ही बांधकामे बाळकृष्ण जगननाथ घरत यांचेकडून बाधित झालेली आहेत. सदर बांधकामांबद्दल बांधकामधारकांस पुष्पक(वहाळ) नोड येथील भूखंड क्र.२९३, सेक्टर–२४, क्षेत्र ३९० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

| गावाचे नाव | निवाडा क्र./ संचिका क्र. | बांधकाम क्र. | बांधकामधारकाचे नाव | बांधकामाचे छपराखालील क्षेत्र (चौ.मी.) | वाटपित भूखंडाचा तपशील: नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उलवे | ULV-ICIG-२४९ | UL–५००, UL–५००A | बाळकृष्ण जगननाथ घरत | १२७.४४ | पुष्पक | २४ | २९३ | ३९० |

भूखंडधारक बाळकृष्ण जगननाथ घरत हे मयत आहेत. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पनवेल यांचेकडील दिवाणी कि.अर्ज क्र.१२३६/२०१८ अन्वये बाळकृष्ण जगननाथ घरत यांचे पश्चात १) श्री. शेखर बाळकृष्ण घरत २) श्रीमती बेबीबाई बाळकृष्ण घरत ३) श्रीमती माई भार्गव घरत ४) श्री. केतन भार्गव घरत ५) श्रीमती करीश्मा भार्गव घरत ६) श्री. सुमित भार्गव घरत ७) श्रीमती कल्याणी विनय म्हात्रे ८) श्रीमती संगिता गणेश भागवत व ९) श्रीमती नयना अजित पाटील यांना कायदेशीर वारस घोषित व प्रमाणित केले आहेत. बाळकृष्ण जगननाथ घरत यांचे वारसांपैकी १) श्रीमती नयना अजित पाटील २) श्रीमती बेबीबाई बाळकृष्ण घरत ३) श्रीमती माई भार्गव घरत ४) श्री. केतन भार्गव घरत ५) श्रीमती करीश्मा भार्गव घरत ६) श्री. सुमित भार्गव घरत ७) श्रीमती कल्याणी विनय म्हात्रे व ८) श्रीमती संगिता गणेश भागवत यांनी उपरोक्त नमूद केलेल्या भूखंडामधील त्यांचे हिश्श्याचे अविभाज्य क्षेत्रासाठी श्री. शेखर बाळकृष्ण घरत यांचे लाभात हक्कसोड पत्र दिलेले आहे. सदर हक्कसोड पत्र क्र. पवल–५–८१०–२०२२, पावती क्र.८७३, दिनांक १७.०१.२०२२ रोजी सह दुय्यम निबंधक पनवेल–५ यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले आहे.

उपरोक्त हक्कसोडपत्राप्रमाणे सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचे करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| अ. क्र. | नावे |
|---|---|
| १) | श्री. शेखर बाळकृष्ण घरत |

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नांवे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा व्यक्तीच्या नांवे सिडकोकडून भूखंडाचे करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांपर्यंत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार यापुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ), तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३०(तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही, असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ)**

**www.cidco.maharashtra.gov.in**
CIN - U99999 MH 1970 SGC-014574

सिडको/जनसंपर्क/१०४/२०२२–२३



MAHAVITARAN

### TENDER NOTICE

Following Tender is invited from Eligible Bidders under Pen Circle Raigad District. The Details are as given below-

| Sr. No. | Tender No. | Particulars | Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission | Estimated Cost (Rs.) | Amount of EMD in Rupees | Tender Cost Fee Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | SE/PC/Tech/ T-6/2022-23 | Tender For Work Contract for the work of material handling i.e. loading/unloading/ stacking and transportation of material/ equipment's from Airoli Store to all Divisions under Pen Circle and from Airoli stores to all Over Maharashtra. | Dt.08/06/2022 To Dt.15/06/2022 Bid Submission Date: 15/06/2022 upto17:00 hrs. | Rs. 20,00000/- | Rs. 20,000/- | Rs. 2950/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://works.mahadiscom.in/eTender/etender.
Contact Person- Executive Engineer (Adm.) Tel No. 02143-252099/257704, Mobile No.7875762777.

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN**

(PRO NO.62)

## निवडक

### तरुणाच्या गळ्यातील चेन लंपास

**पनवेल :** एका तरुणाला कोविड सर्व्हेचे काम मिळवून देण्याच्या बहाण्याने त्याच्या गळ्यातील ७० हजार किमतीची सोनसाखळी लंपास केल्याची घटना मिरची गल्लीत घडली आहे. केशव सोनवणे असे या तरुणाचा नाव असून तो शिक्षण घेत आहे. दरम्यान, एकाने त्याला कोविड सर्व्हेचे काम करण्याबाबत विचारणा केली या कामाला त्याने तयारी दर्शविल्यानंतर त्या व्यक्तीने त्याला दुचाकीवरून शहरातील मिरची गल्ली येथे नेले. त्या ठिकाणी चोरी झाल्याचे सांगून त्याच्या गळ्यातील सोनसाखळी काढण्यास सांगितले आणि त्याला बोलण्यात गुंतवून ती सोनसाखळी लंपास केली.

### अनंता सावंत सेवानिवृत्त

**रसायनी :** रसायनी येथील लोना कंपनीचे पॅंकीग विभागाचे कामगार अनंता सावंत हे चाळीस वर्षे काम करून ते



क्सेवानिवृत्त झाले.कंपनीच्या वतीने त्यांना शाल व धनादेश व भेट दिली गेली. त्यांच्या पॅंकीग विभाग. युनियन व त्याच्या मित्रमंडळी यांनी त्यांना भेट वस्तू दिली गेली. या वेळी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी मेणसे, किशोर महामणकर, गजानन मालुसरे व मुठे साहेब व सावंत यांनी समयोचित भाषण केले. लोना कंपनीचे अधिकारी पाटील, समीर भालेकर, रूपेश कदम, कर्मचारी वर्ग कामगारवर्ग पॅकींग विभागाचे कामगार व त्यांचे कुटुंबीय या वेळी उपस्थित होते.

### कुष्ठरुग्णांसाठी साहित्याचे वाटप

**पनवेल :** कुष्ठरोग निवारण समिती संचालित बलवंतराय मेहता पंचायतराज जागृती केंद्र आणि इनरव्हील डी ३१४ च्या वतीने कुष्ठरुग्ण दवाखान्यामध्ये व कुष्ठरुग्ण पुनर्वसन कक्षामधील कुष्ठरुग्ण बांधवांना साहित्याचे वाटप करण्यात आले. कुष्ठरुग्ण दवाखान्यामध्ये टेबल-खुर्च्या, थर्मामीटर, औषधोपचार साहित्य देण्यात आले. त्यामुळे काही प्रमाणात दवाखान्यातील अडचण दूर झाली, तसेच कुष्ठरुग्ण पुनर्वसन कक्षांमधील कुष्ठ बांधवांना मनोरंजनासाठी टीव्हीसाठी डिश अँटेना देण्यात आला. या वेळी ईनरव्हील डी ३१४ पिडीसी फालगुनी मेहता यांच्या हस्ते तर दवाखान्यातील गोगटे, साखरकर, गणेश दांडेकर आणि कुष्ठरुग्ण बांधव आणि बलवंतराव मेहता सेंटर मधील संजय गुळूबंकर, नामदेव कदम, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे आदिवासी आश्रमशाळेतील बाळाराम रोडपालकर उपस्थित होते.



# आ. गणेश नाईकांच्या इशाऱ्याने पालिकेला जाग

## बेलापूरच्या होल्डिंग पॉंड स्वच्छतेसाठी उपाययोजना सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर येथील होल्डिंग पॉंडच्या स्वच्छतेला सुरुवात केली नाही तर स्वतः पोकलेन घेऊन हा होल्डिंग पॉंड साफ करण्याचा इशारा आमदार गणेश नाईक यांनी महापालिका प्रशासनाला दिला होता. यानंतर हादरलेल्या पालिका प्रशासनाने होल्डिंग पॉंड्स सफाईच्या अनुषंगाने तातडीने उपाययोजना करण्यास सुरुवात झाली आहे.

या भागातील माजी नगरसेवक डॉ. जयाजी नाथ यांनी मागील काही वर्षे सातत्याने हा होल्डिंग पॉंड साफ करण्यासाठी पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. ढिम्म प्रशासनाच्या संथ कार्यवाहीमुळे उद्विग्न झालेल्या डॉक्टर नाथ यांनी याप्रश्नी आत्महत्या करण्याचा इशारा दिला होता.



माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी महापौर सुधाकर सोनावणे, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, शुभांगी पाटील, डॉ. जयाजी नाथ, अशोक गुरखे, राजश्री कातकरी, जगन्नाथ कोळी, रमेश शेट्टी, जयदेव ठाकूर, मोउजी पटेल, तनसुख जैन, हस्तीमल जैन, करसन पटेल, नानजी पटेल, प्रभु पटेल, हेमंत काटकर, सुनील महामुलकर, बाबू भाई जैन, अनिल वेरट, गोविंद प्रेमजी पटेल, सुदर्शन डोंगरे, तसेच पालिका शहर अभियंता संजय देसाई, कार्यकारी अभियंता अरविंद शिंदे, उपअभियंता अजय पाटील आदी उपस्थित होते.

लोकनेते आमदार नाईक यांनी मंगळवारी या बेलापूरच्या होल्डिंग पॉंडची पाहणी केली. मागील वर्षी बेलापूर भागात सुमारे पाचशे घरांमध्ये आणि चारशे दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरून लाखो रुपयांचे नुकसान स्थानिकांचे झाले होते. या पावसाळ्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी लोकनेते नाईक यांनी पालिका प्रशासनाला निर्वाणीचा इशारा दिला होता. पालिका प्रशासनाने होल्डिंग पॉंडच्या साफसफाईच्या दृष्टीने तातडीच्या उपाय योजना सुरू केल्या आहेत. त्याची पाहणी लोकनेते नाईक यांनी केली. महापालिकेचे नगर अभियंता संजय देसाई यांनी या विषयी त्यांना माहिती दिली.

पावसाचे पाणी साचू नये यासाठी १००० हॉर्स पॉवरचे २ पंप लावण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने टाकलेली पाइपलाइन साफ करून घेण्यात आली आहे. दोन पाइपलाइन बदलण्यात आल्या आहेत. नाल्याची रुंदी वाढवण्यात आली आहे. अशी माहिती देतानाच संजय देसाई यांनी होल्डिंग पॉंड सफाईबाबत एमसीझेडएमइकडे प्रस्ताव पाठवला असून तो मंजूर करण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. सल्लागाराची नेमणूक झाली आहे. पुढील वर्षी संपूर्ण गाळ काढण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

डॉक्टर नाथ यांनी लोकांच्या भावना त्यांना होणारा त्रास प्रशासनापर्यंत पोहचवण्यासाठी आत्महत्येचा इशारा दिला होता. डॉक्टर नाथ हे जनसामान्यांचे प्रतिनिधी असून नागरिकांना होणारा त्रास हा आपला त्रास आहे असे ते समजतात. डॉ. नाथ हे हाडाचे समाजसेवक असून या प्रश्नी राजकारण करण्याचा संबंध येत नाही त्यांच्या कार्याबद्दल कोणाच्या प्रमाणपत्राच्या शिफारशींची गरज नाही, असे नाईक यांनी स्पष्ट केले.

## घोट येथे घरफोडी; ऐवज चोरला

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात चोरांनी तळोजा येथील घोटगावातील अरिहंत अन्शूना या इमारतीत घरफोडी करून सुमारे सहा लाख रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. तळोजा पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात चोराविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणातील तक्रारदार काशिनाथ बाविस्कर (वय ६२) हे तळोजा घोटगाव येथील अरिहंत अन्शूना या इमारतीतील पत्नीसह राहण्यास आहेत. त्यांच्या दोन्ही मुलींचा विवाह झाला असून त्यांचा मुलगा परदेशात शिक्षण घेण्यासाठी गेला आहे. बाविस्कर यांची एक विवाहित मुलगी चेंबूरच्या बीएआरसी कॉलनीत राहण्यास असल्याने बाविस्कर व त्यांची पत्नी हे दोघेही मुलीच्या घरी गेले होते. यादरम्यान त्यांचे घर बंद असल्याने चोरट्यांनी संधी साधून त्यांच्या घराचा कडी कोयंडा तोडून घरातील दोन लाख १० हजार रुपयांच्या रोख रक्कमेसह वेगवेगळ्या प्रकारचे दागिने असा एकूण सहा लाख रुपये किमतीचा ऐवज चोरून पलायन केले. बाविस्कर घरी परतल्यानंतर चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोराविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

## भाजपतर्फे गृहसंकुलात वृक्षारोपण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून घणसोली येथे नव्याने झालेल्या सिडको प्रकल्पांतर्गत मालकंस गृहसंकुलात भारतीय जनता पक्ष घणसोली विभाग आणि स्थानिक रहिवाशांच्या वतीने वृक्षलागवड करण्यात आली.

दरम्यान, या वृक्षारोपण कार्यक्रमात माझी सोसायटी माझी जबाबदारी या वाक्याचे ब्रीद वापरून सोसायटीच्या परिसरामध्ये अनेक प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या वेळी पाम, चाफा, जासवंद विविध प्रकारचे साधारण २५ वृक्षारोपन



करण्यात आले. तर या वेळी सर्वांनी सोसायटीमध्ये फक्त रोपे लावली जाणार नाहीतर त्या रोपांची चांगल्याप्रकारे देखभाल, संगोपन करण्यासाठी सोसायट्यांमधील नागरिकांचे एक पाऊल पुढे असणार आहे. त्यासाठी सोसायटी प्रयत्नशील राहील, असे मत सोसायटीमधील नागरिकांनी व्यक्त केले.

वृक्षारोपण कार्यक्रमाच्या वेळी सोसायटीचे सभासद किरण शेडगे, चंद्रशेखर हेंडवे, संजोग येरुनकर, राकेश कांबळे, मयूर जाधव, सुरेश चिकणे, संदीप भिऊंगडे, रफीक अंसारी, गिरीश देसाई, हर्षद चव्हाण, सचिन तांडेल, शरद पालव, सुनील बोराडे, शंकर चव्हाण, शंकर धोंडे, गृहसंकुलाच्या गृहलक्ष्मी अर्चना शेडगे, माधुरी हेंडवे, शीतल भिऊंगडे, कोमल कांबळे, अन्वी येरुनकर, श्रेया पाटील तसेच भाजप कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## पनवेलच्या लिमये वाचनालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयात शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज याच्या प्रतिमेला संस्थेच्या अध्यक्षा सुनिता जोशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.संस्थेचे कार्यवाह काशीनाथ जाधव यांनी छत्रपती शिवाजी महाराज याच्या जीवनातील काही ठळक प्रसंग आपल्या ओघवत्या शैलीत सुंदर वर्णन केले.



गधार बालनाट्य शिबिरातील ५ ते १२ वर्षे वयोगटातील मुलांनी शिवकालीन अनेक प्रसंग आपल्या अभिनयाने एकपात्री प्रयोगने आणि नृत्य, नाट्याद्वारे बहारदार पद्धतीने सादर केले. श्रावणी, रीतीशा, प्रांजल, सनिका, अंतरिक्ष, निरभा, पूर्वा, वरद, सुरभि, नीरजा, विवान, विभ्रा आणि निसर्गा या बालकलाकारांनी सादर केलेला शिवराज्याभिषेक सोहळा अतिशय मोहक पद्धतीने सादर केला. बालशिवाजी, जिजाऊ, सोयराबाई, गागाभट्टयांच्या व्यक्तिरेखा प्रेक्षकांना भुरळ पडणाऱ्या होत्या. सोहळ्याचे आणखीन आकर्षण म्हणजे अफजलखानाचा वधाचा प्रसंग आणि नीरजा, रीतिशा, निरभा याच्या नृत्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

मुलांना संस्थेकडून पुस्तक भेट, खाऊचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या सहकार्यवाह जयश्री शेट्ये यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमात शाम वालावलकर दत्तात्रेय जाधव, अंनत सिंगासने, चंद्रकांत कुरघोडे व पालक वर्ग, वाचक वर्ग मोठ्या संख्यने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल निकिता शिंदे, संपदा जोशी, संजय दिवटे यांनी विशेष मेहनत घेतली.

## उरण महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. बळीराम एन. गायकवाड होते, तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. संदीप गोविंद लोंढे (इतिहास विभाग, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली) यांची उपस्थिती होती.

प्राचार्य गायकवाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन आदर्शवत होते असे सांगून, शिवकालीन किल्ल्यांचे संवर्धन झाले पाहिजे व अधिक संशोधन होऊन त्यांच्या विविध पैलूंवर प्रकाश पडला पाहिजे असे मत व्यक्त केले. प्रमुख वक्ते लोंढे यांनी शिवकळा संदर्भातील विविध इतिहास लेखन प्रवाह, साधने व त्यांची चिकित्सा या विषयावर आपले विस्तृत विवेचन मांडले. मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन झाले पाहिजे असे मत व्यक्त करून त्यांनी वसाहतवादी इतिहास लेखन, राष्ट्रवादी इतिहास लेखन, पुरोगामी इतिहासलेखन याविषयी सविस्तर विवेचन केले व हिंदवी स्वराज्याच्या उभारणीमध्ये स्वराज्यसंकल्पक म्हणून शहाजीराजे यांची भूमिका त्यांनी विशद केली.

पाहुण्यांचा परिचय व स्वागत प्रा. डॉ. एच. के. जगताप यांनी केले तर सूत्रसंचालन व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्राध्यापक डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. एम. जी. लोंढे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




## पनवेलमध्ये पर्यावरण दिनी जाणीव सामाजिक सेवा संस्थेचा शुभारंभ

**पनवेल : वार्ताहर**

पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जाणीव या सामाजिक सेवा संस्थेचा शुभारंभ सोहळा घरगुती स्वरूपात नवीन पनवेल येथे बांठीया विद्यालयात झाला. कार्यक्रमासाठी आलेले प्रमुख वक्ते निसर्ग मित्रचे डॉ. आशिष ठाकूर यांनी दैनंदिन जीवनातील पर्यावरण संतुलन कसे ठेवू शकतो याचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष आणि ज्येष्ठ विश्वस्त डॉ. सतीश उमरीकर यांनी मनोगत व्यक्त केले आणि मार्गदर्शनही केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने, महाराष्ट्र टाईम्सने गौरविलेल्या पनवेल मधील मनिष जोशी आणि अमोल साखरे या दोन पर्यावरण दुतांचा संस्थेतर्फे सन्मान करण्यात आला. त्याप्रसंगी त्यांनी त्यांच्या उपक्रमाबाबत उपस्थितांना माहिती दिली. कार्यक्रमासाठी असलेल्या प्रमुख पाहुणे यांना रोपटे देऊन सन्मान करण्यात आला तसेच सर्व उपस्थितांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष विजय गोरेगांवकर यांनी संस्थेची उद्दिष्ट्ये आणि भविष्यातील कार्यक्रम याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी पर्यावरण रक्षणाची शपथ घेण्यात आली. अक्कलकोटे यांनी स्वतः तयार केलेली शपथ उपस्थितांना दिली. पर्यावरण पूरक सोहळ्याद्वारे आज जाणीवचा शुभारंभ झाला. या सोहळ्यास पनवेल, ठाणे, मुंबई, नवी मुंबई आणि आसपासच्या परिसरातील अनेक पर्यावरणप्रेमी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संस्थेतील अनेक मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमाच्या पूर्व संध्येला निसर्ग मित्र या संस्थेसोबत फळ झाडांच्या बियारोपण व वृक्षारोपण कार्यक्रमात जाणीवच्या काही सदस्यांनी सहभाग घेतला.

## नवी मुंबईतील ५३ पोलीस कर्मचाऱ्यांनी घेतला बूस्टर डोस

**नवी मुंबई : बातमीदार**

पहिल्या फळीतील कोरोना योध्दे म्हणून महत्त्वाची कामगिरी बजावलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी दुसरा डोस घेतल्यानंतर नऊ महिन्यांनी घ्यावयाचा तिसरा डोस अर्थात बूस्टर (प्रिकॉशनरी) डोस विहित कालावधीत घ्यावा यादृष्टीने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये विशेष लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ५३ पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी प्रिकॉशनरी डोस तसेच एका पोलीस कर्मचाऱ्याने कोविड लसीचा दुसरा डोस घेतला.


(संग्रहित छायाचित्र)

नवी मुंबईत आत्तापर्यंत १३ लाख ७५ हजार ११ नागरिकांनी पहिला डोस, १२ लाख २७ हजार ६९४ नागरिकांनी दुसरा डोस तसेच ६९ हजार ८३५ नागरिकांनी तिसरा म्हणजेच प्रिकॉशनरी डोस घेतलेला आहे.

शासनाने दिलेल्या उद्दिष्टानुसार लोकसंख्येच्या तुलनेत कोव्हीड लसीकरणामध्ये पहिल्या व दुसऱ्या डोसचे १०० टक्के लसीकरण पूर्ण करण्यात नवी मुंबई नंबर वन शहर ठरले. तसेच १५ ते १८ आणि १२ ते १४ वयोगटातील मुलांच्या लसीकरणाच्या प्रमाणातही नवी मुंबई आघाडीवर आहे. त्याचप्रमाणे तिसऱ्या प्रिकॉशनरी डोसकडेही प्राधान्याने लक्ष दिले जात असून लाभार्थ्यांनी विशेषत्वाने ज्येष्ठ नागरिकांनी लसीकरणाव्दारे कोव्हीडचा प्रकृतीवर होणारा परिणाम कमी होण्यास मदत होते हे लक्षात घेऊन विहित वेळेत प्रिकॉशनरी डोस घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी केले आहे.

## पर्यावरण दिनानिमित्त सायकल रॅली, वृक्षारोपण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

इंदेमित्सु ल्युब इंडिया प्रायव्हेट लिमिटेड व येरळा प्रोजेक्ट्स सोसायटी सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सायकल रॅली व वृक्ष लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पनवेल ते रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी परिसरातील जांभिवली सायकल अशी सायकल रॅली काढण्यात आली. या वेळी जांभिवली येथे रॅली आल्यानंतर जांभिवली ग्रामपंचायत आवारात वृक्ष लागवड करण्यात आले. या कार्यकम अंतर्गत एकूण ७५० विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.



रॅलीमध्ये जवळपास साठ सायकलस्वार सहभागी झाले होत. या वेळी इदेमित्सुचे सिनिअर मॅनेजर भूषण दामले यांनी इदेमित्सु ल्युब इंडियामार्फत आपण कार्यक्रम नियोजीत करत असताना पर्यावरण पूरक व पर्यावरण संरक्षण या आधारित कार्यक्रम नियोजित केले पाहिजे व झिरो वेस्टेज अमंलात आणले पाहिजे. या धोरणावर इंदेमित्सु कंपनी काम करीत असल्याचे सांगितले. येरळाचे प्रकल्प संचालक श्रीपाल सप्तसागर यांनी इदेमित्सु ल्युब इंडिया व येरळा प्रोजेक्ट्स सोसायटी गेले तीन वर्ष पाताळगंगा एमआईडीसी हद्दीत पेहचान प्रोजेक्ट राबवीत आहेत. त्याचबरोबर महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जात असल्याचे सांगितले. या वेळी सिनिअर मॅनेजर भूषण दामले, श्रीपाल सप्तसागर, संचालक येरळा प्रोजेक्ट्स सोसायटी. नैनेश मेहता, उपाध्यक्ष इदेमित्सु ल्युब इंडिया, तसेच इदेमित्सुचे पदाधिकारी यांच्या हस्ते गरोदर व स्तनदा मातांना सकस आहार किटचे वाटप करण्यात आले. अश्याप्रकारे जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्प समन्वयक देवदास झेंडे यांनी केले व उपस्थितांचे आभार ज्योस्त्ना देशमुख यांनी मानले.

# पेणमधील २३ इमारती धोकादायक!

## घरे खाली करून पुनर्बांधणीचे पालिका प्रशासनाचे आदेश

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील धोकादायक आणि अत्यंत धोकादायक इमारतींची यादी पेण नगर परिषद प्रशासनाने जाहीर केली असून यामध्ये १० अत्यंत धोकादायक तर १३ धोकादायक अशा एकूण २३ इमारतींचा समावेश आहे. धोकादायक इमारतींची डागडुजी आणि अत्यंत धोकादायक इमारतींची पुनर्बांधणी करुन घेण्याचे आदेश नगर परिषदेने इमारतधारकांना दिले आहेत.

सन २०२० मध्ये महाडमधील तारिक गार्डन ही पाच मजली इमारत कोसळून १३ रहिवासी मृत्यमुखी पडले होते तर नऊ जण जखमी झाले होते. त्यानंतर रायगड जिल्ह्यातील सर्वच नगर परिषद प्रशासन सतर्क झाले असून दरवर्षी धोकादायक आणि अत्यत धोकादायक इमारतींचा सर्व्हे करण्यात येत आहे. पेण नगर परिषदेने केलेल्या सर्व्हेनुसार शहरात १० अत्यंत धोकादायक आणि १३ धोकादायक इमारती आढळल्या आहेत. या



इमारती धोकादायक घोषित करण्यात आल्या असल्या तरी नगर परिषदेच्या आदेशांचे पालन आणि नोटीसीचे गांभीर्य किती इमारतधारक घेतात हेदेखील महत्त्वाचे आहे.

अत्यंत धोकादायक इमारती आहेत त्या लवकरात लवकर खाली करा किंवा त्या पाडून त्यांची पुनर्बांधणी करा तसेच ज्या इमारती धोकादायक आहेत त्या इमारतधारकांनी संरचनात्मक इंजिनिअरच्या परवानगीने त्याची त्वरित डागडूजी करून घ्यावी असे आदेश पेण नगर परिषदेच्या बांधकाम विभागाने दिले आहेत.

ज्या अत्यंत धोकादायक इमारती जाहीर करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये पेण बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिंचपाडा आदी मोक्याच्या ठिकाणी आहेत. त्यामुळे या अत्यंत धोकादायक इमारतींचा विषय प्रशासन आणि इमारतधारक या दोघांनीही गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. अत्यंत धोकादायक इमारतींमध्ये आजही काही सदनिकाधारक अगदी निर्भिडपणे वास्तव्य करत असून नैसर्गिक आपत्तीत एखादी दुर्घटना घडली तर त्याचे परिणाम लक्षात घेऊन त्यांनी आजच योग्य तो विचार करणे गरजेचे आहे.

> **पेण शहरातील सर्व इमारतींचा आढावा घेतला असता आम्हाला १० अत्यंत धोकादायक आणि १३ धोकादायक इमारती आढळल्या. या इमारतधारकांना आम्ही सतर्क केले असून अत्यंत धोकदायक इमारतधारकांना इमारत पाडून पुनर्बांधणी करण्याच्या सूचना तर धोकादायक इमारतधारकांना संरचनात्मक इंजिनिअरच्या परवानगीने इमारतीची डागडुजी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**
>
> **–विनायक बनसोडे, बांधकाम अभियंता,पेण नगर परिषद**

# पावसाळा आला, मात्र रोहा भुवनेश्वरमधील प्रश्न प्रलंबितच; पं.स.चा अहवाल गुलदस्त्यात

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील भुवनेश्वरमधील काही भागात पावसाळ्यात पाणी भरत असल्याने तेथील नागरिकांना मोठा त्रास होतो. ही समस्या सोडविण्यासाठी तेथील नागरिकांनी स्थानिक लोकप्रतिनिधी, शासन यंत्रणा यांच्याकडे निवेदने दिली, मात्र आश्वासनाव्यतिरिक्त त्यांच्या समस्यांचे निराकरण झालेच नाही. त्यामुळे आपत्ती घडल्यानंतरच ही समस्या सोडविण्यात येणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

वरसे (ता. रोहा) ग्रामपंचायत हद्दीतील भुवनेश्वरमधील काही नागरी भागात गेल्या अनेक वर्षांपासून पावसाचे पाणी तुंबत असल्याने तेथील नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. त्याबाबत तेथील नागरिकांनी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच रोहा प्रांताधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यांच्याकडे सातत्याने तक्रारी केल्या आहेत.

भुवनेश्वर परिसरात पाणी तुंबण्याचे कारण शोधण्यासाठी तीन वर्षापुर्वी गटविकास अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. त्या समितीने १४ मुद्दे घेत अहवाल सादर केला, मात्र तो बिल्डरांना मारक असल्याने गुलदस्त्यातच ठेवण्यात आला. दुसरीकडे गेल्या वर्षी झालेल्या बैठकीत पाटबंधारे विभागाने अहवाल दिला होता, तोही गोपनीय ठेवण्यात आला आहे.

खासदार सुनिल तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांनी भुवनेश्वर भागात पहाणी करुन पाणी तुंबण्याच्या समस्येचे निवारण करण्याचे आश्वासन दिले होते. तर पालकमंत्री आदिती तटकरे यांनी गेल्या वर्षी भर पावसात भुवनेश्वर येथे जाऊन पाहाणीही केली. त्यावेळी त्यांनी ही समस्या सोडविण्यासाठी स्थानिक नागरिक, संबंधीत ग्रामपंचायत, बिल्डर व पत्रकार यांची बैठक घेऊन ही समस्या सोडविण्याचे आदेश महसूल विभागाला दिले होते. त्यानुसार गेल्या आठ महिन्यात रोहा पंचायत समिती, वरसे ग्रामपंचायत, बिल्डर, पाटबंधारे विभाग व पत्रकार यांच्या एकत्रीत तीन बैठका घेण्यात आल्या. यातील एक बैठक वरसे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये व दोन बैठका तहसील कार्यालयात घेण्यात आल्या. या बैठकीत फक्त प्राथमिक माहिती घेण्यात आली. पुढे या ना त्या कारणास्तव बैठका घेण्यात आल्या नाहीत. सध्या पावसाळा तोंडावर आला आहे. मात्र पावसाळ्यात भुवनेश्वरमधील काही भागात पाणी तुंबत असल्याची समस्या ही पाहणी, अहवाल, आश्वासने, बैठाका यातच अडकून पडली आहे. या पावसाळ्यात भुवनेश्वर भागात काय खबरदारी घेणार, याची चर्चासुध्दा नाही.



(छाया : संतोष पेरणे)

# माथेरानमध्ये घोड्यांची आरोग्य तपासणी

**कर्जत : बातमीदार**

माथेरानमधील घोड्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी रायगड जिल्हा पशुसंवर्धन विभागाकडून शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात व्हेटरिनरी प्रॅक्टिशनर्स वेल्फेअर असोसिएशन या संस्थेने सहभाग घेतला होता.

पशुसंवर्धन विभागाच्या माथेरानमधील दवाखान्यात परवाना पूर्व घोड्यांसाठी शुक्रवार आणि शनिवार महाआरोग्य शिबिर घेण्यात आले. येथील पशुधन विकास अधिकारी अमोल कांबळे तसेच व्हेटरिनरी प्रॅक्टिशनर्स वेल्फेअर असोसिएशनचे डॉ. रोहित गायकवाड, डॉ. राजेंद्र मरगज, डॉ. गुरुप्रसाद महाडिक, डॉ. दिलीप चौधरी आणि डॉ. प्रशांत बिराजदार यांनी माथेरानमधील घोड्यांची तपासणी केली. दोन दिवस चाललेल्या शिबिरात एकूण ४६० घोड्यांची तपासणी करण्यात आली. माथेरान पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक शेखर लव्हे यांनी या शिबिराला भेट दिली.

# कोलाड येथील धर्माधिकारी महाविद्यालयात शिवराज्यभिषेक दिन सोहळा उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोलाड येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि. ६) छत्रपती शिवाजी महाराज राज्यभिषेक सोहळा दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. प्रा. अडलीकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या ३४८ व्या राज्यभिषेक सोहळा दिनानिमित्त आपले विचार व्यक्त केले.



(छाया : महादेव सरसंबे)

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर मुंडे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. अनिरुद्ध मोरे, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख प्रा. सूर्यकांत आमलपुरे, विज्ञान प्रमुख प्रा. रेश्मा शेळके यांच्यासह सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेत्तर कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# लवजी स्टेशनमध्ये पत्रकाराने वाचविले तरुणीचे प्राण




**खोपोली : प्रतिनिधी**

कर्जत-खोपोली रेल्वे मार्गावरील लवजी स्थानकात लोकलमधून उतरत असताना, एका तरुणीचा तोल गेल्याने ती खाली पडली. त्याक्षणी लोकलमध्ये प्रवासी असणारे पत्रकार विनीत जाधव यांनी प्रसंगावधान राखून सदर तरुणीस फलाटावर ओढल्याने पुढील अनर्थ टळला. विनीतच्या धाडसाचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार खोपोलीहून मुंबईकडे जाणारी लोकल सायंकाळी सहाच्या सुमारास लवजी स्थानकात आली. तेथे एक तरुणी व तिची आई लोकलमधून उतरत असताना, तरुणीचा तोल गेला. व तिचे हात व पाय फलाट व लोकल मधल्या भागात जात असतानाच त्याच लोकलमधून प्रवास करीत असणाऱ्या पत्रकार विनित जाधव यांनी प्रसंगावधान राखून त्या तरुणीला तात्काळ फलाटावर ओढले त्याचवेळी लोकलही सुरु झाली. त्या तरुणीची आई फलाटावर कोसळली होती. दोघी जणी सुखरूप आहेत. त्यानंतर त्या दोघीजणी रिक्षातून निघून गेल्यामुळे त्यांची नावे समजली नाही. पत्रकार विनित जाधव यांच्या धाडसाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# खोपोली पोलीस ठाण्यात बालस्नेही कक्षाचे लोकार्पण





(छाया : विनायक माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

कैलास सत्यार्थी चाईल्ड फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून खोपोली पोलीस ठाण्यात बालस्नेही कक्षाची निर्मिती करण्यात आली असून, त्याचे लोकार्पण मंगळवारी (दि. ७) संध्याकाळी उपविभागीय पोलीस अधीक्षक संजय शुक्ला यांच्या हस्ते करण्यात आले.

केंद्र व राज्य बालहक्क कायदे व बाल लैंगिक अत्याचार तपास नियमाअंतर्गत प्रत्येक पोलीस ठाण्यात बालस्नेही कक्षाची निर्मिती करण्यासाठी कैलास सत्यार्थी चाईल्ड फाउंडेशन ही सामाजिक संस्था कार्यरत आहे. या संस्थेच्या माध्यमातून व रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली पोलीस ठाण्यामध्ये बालस्नेही कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. या बालस्नेही कक्षात टीव्ही, सीसीटीव्ही कॅमेरे, लहान मुलांसाठी आवश्यक ती खेळणी, मनोरंजनाचे अन्य साहित्य, भिंतीवर चित्रे आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

खोपोली पोलीस ठाण्यातील बालस्नेही कक्षाच्या लोकार्पण कार्यक्रमाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिरीष पवार, फाउंडेशनच्या महाराष्ट्र राज्य समन्वयक श्रीमंती हेमंती मॅडम, खोपोली समन्वयक दीप्ती रामराजे, बाल कल्याण समितीचे जिल्हाध्यक्ष जगन्नाथ साळुंखे यांच्यासह अन्य सदस्य, समर्थ प्रतिष्ठानचे सदस्य जयदीप कुंभार, कमलेश कोरपे यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी व शहरातील सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# फळबाग लागवड योजनेत सहभागी व्हा

## माणगाव तालुका कृषी अधिकारी रवींद्र पवार यांचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड योजनेत माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका कृषि अधिकारी रवींद्र पवार यांनी केले आहे.

कृषि विभागतर्फे खरीप हंगामामध्ये सन २०२२-२३ या वर्षामध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड योजना राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, निराधिसूचित जमाती (विमुक्त जमाती ), दारिद्र्य रेषेखालील इतर कुटुंबे, दिव्यांग व्यक्ती कुटुंब प्रमुख असलेली कुटुंबे,जमीन सुधारणांचे लाभार्थी, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण योजनेखालील लाभार्थी, अनुसूचित जमातीचे व इतर पारंपरिक वनवासी (वनहाक्के मान्य करणे) अधिनियम २००६ (२००७



(छाया : सलीम शेख)

चा २) खालील लाभार्थी पात्र आहेत. या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्याकडे जॉब कार्ड असणे आवश्यक आहे तसेच या योजनेअंतर्गत फळबाग लागवाडीसाठी कमीत कमी ०.०५ हेक्टर व जास्तीत जास्त दोन हेक्टर प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादा राहील.सदर योजनेत लाभ घेण्यासाठी इच्छुक लाभधारकांच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे.


या योजनेअंर्गत शेतकरी आंबा, काजू, चिकू, पेरू, नारळ, बोर, सीताफळ, आवळा, चिंच, कवठ, जांभूळ, कोकम, फणस, अंजीर, सुपारी, बांबू, साग, जाड्रोफा, गिरीपुष्प, कढीपत्ता, कडुलिंब, सिंधी, शेवगा, हादगा, केळी, ड्रॅगनफ्रूट, द्राक्ष, चंदन, गुलमोहर, करवंद, मॅजियम, ताड, खैर, बाभूळ, सुबाभूळ इत्यादी प्रकारच्या ५९ फळपिकांची लागवड करू शकतात.

या योजनेचं लाभ घेण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज, जॉब कार्ड, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती मध्ये मोडत असल्यास जातीचा दाखला, आधार कार्ड, व बँकेचे पास बुक अर्जासोबत जोडून ग्रामपंचायत कार्यालय किंवा कृषि सहाय्यक यांच्याकडे सादर करावे. शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने फळबाग लागवड करून आपल्या शेतीचे उत्पादन वाढवावे, असे आवाहन माणगाव तालुका कृषि अधिकारी रवींद्र पवार यांनी केले आहे.

# विराणी आदिवासीवाडीत निसर्ग साहस शिबिर; विद्यार्थ्यांचा सहभाग

**पाली : प्रतिनिधी**

रायगड़ जिल्ह्यातील पेण तालुक्यातील विराणी आदिवासीवाडीत तीन दिवसीय निसर्ग साहस शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात विविध साहसी खेळांचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. या शिबिरात सीएफआय या आंतरराष्ट्रीय संस्थेतील व मुंबई, पुण्यातील विद्यार्थी सहभागी झाले होते.



(छाया : धम्मशील सावंत)

राधा व रोहन मनोरे यांनी या शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात विद्यार्थ्यांनी ५० फुट रॅपलिंग आणि १२५ फुट झिप लाइन आदी साहसी प्रकार स्वतः केले. या वेळी विविध नाविन्यपूर्ण खेळातून विद्यार्थ्यांना गटात काम करणे व नेतृत्वगुण विकास आदींचे प्रशिक्षणदेखील देण्यात आले. या शिबिरातील विद्यार्थी तीन दिवस आदिवासी बांधवांबरोबर राहिले. या माध्यमातून आदिवासी संस्कृती व जीवनमान आदींची महत्त्वपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. यावेळी विद्यार्थ्यांनी म्हशीचे दूध काढण्याचा आनंद घेतला. तंबूत दोन रात्री घालवल्या.

या शिबिराचे आयोजक रोहन व राधा मनोरे यांनी सांगितले की, २००६ पासून आम्ही विविध साहस शिबिरांचे आयोजन रायगड जिल्ह्यात तसेच महाबळेश्वर आदी वेगवेगळ्या ठिकाणी करीत आहोत. रायगड जिल्ह्यासह पुणे, मुंबई व इतरही ठिकाणच्या विद्यार्थ्यांचा त्याला खूप चांगला प्रतिसाद मिळतो. या शिबिरातून विद्यार्थ्यांना निसर्गाशी मैत्री करता येते.

आगामी शिबिर ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित करण्यात येणार आहे, असे आयोजक रोहन व राधा मनोरे यांनी या वेळी सांगितले.

# संयुक्ताचा ‘सुवर्णपंच’

## जिम्नॅस्टिक्समध्ये छाप; पदकतालिकेत महाराष्ट्र पुन्हा अग्रस्थानी



**पंचकुला : वृत्तसंस्था**

ठाण्याच्या संयुक्ता काळेने खेलो इंडिया युवा क्रीडास्पर्धेत तालबद्ध जिम्नॅस्टिक्समध्ये पाच सुवर्णपदकांची कमाई केली. या क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी चुणूक दाखवताना आतापर्यंत एकूण २१ पदके (सहा सुवर्ण, सात रौप्य, आठ कांस्यपदके) जिंकली आहेत. महाराष्ट्राने मंगळवारी ११ सुवर्णपदकांसह एकूण २० पदके कमावली. याच बळावर महाराष्ट्राने (२४ सुवर्ण, २२ रौप्य, १७ कांस्यपदके) हरयाणाला मागे टाकत (२३ सुवर्ण, २० रौप्य, २९ कांस्यपदके) पुन्हा गुणतालिकेत अग्रस्थान प्राप्त केले.

१६ वर्षीय संयुक्ताने तालबद्ध जिम्नॅस्टिक्समध्ये रोप, हूप, बॉल, क्लब्स आणि रिबन प्रकारात सर्वोत्तम कामगिरी केली. निष्का काळेनेही रौप्यपदक पटकावत पदकतालिकेत भर घातली.

उंच उडीत कोल्हापूरच्या अनिकेत मानेने (२.०७ मीटर) सुवर्णपदक तर रायगडच्या आर्यन पाटीलने (२.०४ मीटर) रौप्यपदक जिंकले. सातार्‍याच्या सुदेष्णा शिवणकरने १०० मीटर शर्यतीत सुवर्ण तर पुण्याच्या अवंतिका नरळेने रौप्यपदक मिळवले. चार बाय १०० मीटर रीलेमध्ये दिग्विजय चौघुले, सार्थक शेलार, आर्यन कदम व आकाश सिंग या चौकडीने सुवर्णपदक जिंकले. प्रकारात महाराष्ट्राच्या मुलींच्या संघानेही सुवर्णपदक जिंकले. या संघात सुदेष्णा, साक्षी चव्हाण, अवंतिका, संजया सावंत यांचा समावेश होता.

सायकलिंगमध्ये मुलांमध्ये मंगेश ताकमोगेने आणि मुलींमध्ये पूजा दानोळेने रौप्यपदके पटकावली. कुस्तीमधील फ्रीस्टाईल प्रकारातील ५१ किलो वजनी गटात कोल्हापूरच्या नरसिंग पाटीलने सुवर्ण तर, रोहित पाटीलने रौप्यपदक मिळवले. मुलींच्या ४९ किलो वजनी गटात अहिल्या शिंदेने कांस्यपदक तर ६५ किलो वजनी गटात कोल्हापूरच्या शुभम पाटीलने सोनेरी कामगिरी केली. ७१ किलो गटात संकेत पाटीलने कांस्यपदक मिळवले.

मुंबईच्या दर्शन पुजारीने बॅडिमटनमध्ये सुवर्णपदक प्राप्त करीत लक्ष वेधले. कबड्डीत महाराष्ट्राच्या मुलींनी अंतिम सामन्यात हरयाणाला ४८-२९ असे नामोहरम केले. हरयाणाच्या खेळाडूंच्या आक्रमक चढायांसमोर महाराष्ट्राचे खेळाडू निरुत्तर झाले. महाराष्ट्राच्या हरजीत कौर, यशिका पुजारी आणि मनीषा राठोडने पराभव टाळण्यासाठी शर्थीने प्रयत्न केले.

# मिताली राजचा क्रिकेटला अलविदा

## सोशल मीडियाच्या माध्यमातून निवृत्तीची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**



भारतीय महिला क्रिकेटमधील दिग्गज आणि अनुभवी खेळाडू असलेल्या मिताली राजने सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर पोस्ट करून मितालीने याबाबत माहिती दिली. मिताली एक दिवसीय आणि कसोटी सामन्यांमध्ये भारतीय महिला संघाचे नेतृत्व करीत होती.

‘इतकी वर्षे संघाचे नेतृत्व करणे ही एक सन्मानाची गोष्ट होती. त्यामुळे मला एक चांगली व्यक्ती होण्यास मदत झाली. भारतीय महिला क्रिकेटच्या विकासामध्ये मी योगदान देऊ शकले’, असे मिताली आपल्या निवृत्तीच्या नोटमध्ये म्हणाली आहे. याशिवाय तिने संघातील सर्व सहकारी, बीसीसीआय, बीसीसीआयचे सर्व पदाधिकारी आणि सर्व चाहत्यांचेही आभार मानले आहेत.

नुकत्याच जाहीर झालेल्या आयसीसीच्या महिला एकदिवसीय क्रमवारीमध्ये ती सातव्या स्थानावर होती. मिताली राजने यंदाच्या महिला विश्वचषकातही भारताचे कर्णधारपद भूषवले होते. मितालीने आतापर्यंत सहा विश्वचषकांमध्ये सहभाग घेतलेला आहे. तिच्या नावावर अनेक विक्रम नोंदवलेले आहेत.

# विराट कोहली सोशल मीडियावर सुऽऽसाट!

## २० कोटी फॉलोअर्सचा आकडा केला पार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि स्फोटक फलंदाज विराट कोहली गेल्या काही काळापासून विराट खराब फॉर्मचा सामना करीत आहे. नुकत्याच झालेल्या इंडियन क्रिकेट प्रीमियर लीग ट्वेण्टी-२० क्रिकेट स्पर्धेत तर तो धावा जमवण्यासाठी झगडताना दिसला. तरी नुकतेच सोशल मीडिया साईट असलेल्या इन्स्टाग्रामवर विराटने २० कोटी फॉलोअर्सचा आकडा पार केला आहे. अशी कामगिरी करून त्याने मैदानाबाहेर एक नवीन विक्रमच नोंदवला आहे.

विराट कोहलीने मैदानावर चांगली कामगिरी केली नाही तरी त्याच्या चाहत्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. सोशल मीडियावरील त्याच्या चाहत्यांचा आकडा बघून याची कल्पना केली जाऊ शकते. इन्स्टाग्रामवर विराट कोहलीचे २० कोटींहून (२०० दशलक्ष) अधिक फॉलोअर्स झाले आहेत. स्वतः विराटने पोस्ट करून आपल्या या कामगिरीबाबत माहिती दिली. २० कोटींहून अधिक फॉलोअर्स असलेला तो जगातील पहिला क्रिकेटपटू ठरला आहे.

इन्स्टाग्रामवर सर्वांत जास्त फॉलोअर्स असलेल्या जागतिक स्तरावरील खेळाडूंच्या यादीमध्ये विराट कोहली तिसर्‍या क्रमांकावर आला आहे. पोर्तुगालचा फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डो पहिल्या स्थानावर आहे. त्याचे ४५१ दशलक्ष फॉलोअर्स आहेत. रोनाल्डोनंतर अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीला इन्स्टाग्रामवर ३३४ दशलक्ष चाहते फॉलो करतात. विशेष म्हणजे विराट इन्स्टाग्रामच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची कमाईदेखील करतो.

# टी-२० मालिकेतून कर्णधार राहुल ‘आऊट’

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात गुरुवार (दि. ९) पासून पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेला सुरुवात होणार आहे. या मालिकेआधी टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे. हंगामी कॅप्टन केएल राहुल आणि कुलदीप यादव हे दोघे दुखापतीमुळे या मालिकेतून बाहेर पडले आहेत. बीसीसआयने ट्वीट करीत याबाबतची माहिती दिली.

राहुल हा मांडीच्या दुखापतीमुळे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतून बाहेर पडला आहे, तर कुलदीप नेटमध्ये फलंदाजी करताना त्याच्या हाताला मार लागला. त्यामुळे कुलदीपलाही आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत खेळता येणार नाही.

# नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत गिरीने आनंदला रोखले

## कार्लसन अग्रस्थानी

**स्टॅव्हंगर (नॉर्वे) : वृत्तसंस्था**



भारताचा आघाडीचा बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदला नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या सहाव्या फेरीत मंगळवारी (दि. ७) नेदरलँड्सच्या अनिश गिरीने बरोबरीत रोखले. पारंपरिक (क्लासिकल) प्रकाराच्या या सामन्यातील बरोबरीनंतर अर्मागेडन डावसुद्धा अनिर्णीत राहिला. त्यामुळे ११.५ गुण खात्यावर असलेला आनंद आता दुसर्‍या स्थानावर गेला आहे.

विश्वविजेत्या कार्लसनने अझरबैजानच्या शख्रियार मामेदेरोव्हवर विजय मिळवताना १२.५ गुणांसह अग्रस्थान काबीज केले आहे. पारंपरिक प्रकारात आनंद काळ्या मोहर्‍यांनिशी खेळला. इंग्लिश व्हॅरिएशन पद्धतीने खेळल्या गेलेल्या या डावात ३५ चालींनंतर दोघांनी बरोबरी स्वीकारली. त्यानंतर बरोबरीची कोंडी फोडण्यासाठी झालेल्या अर्मागेडन डावात ४५ चालींनंतरही सामना निकाली ठरू शकला नाही. अर्मागेडनच्या नियमानुसार, हा सामना अनिर्णित राहिल्यास काळ्या मोहर्‍यांनिशी खेळणार्‍याला विजयी ठरवले जाते. त्यामुळे आनंदला बरोबरीनंतरही अर्धा गुण अधिक मिळवता आला.

पाचव्या फेरीत कार्लसनला हरवण्याची किमया साधणार्‍या ५२ वर्षीय आनंदची आठव्या फेरीत तैमूर राजाबोव्हशी गाठ पडणार आहे. कार्लसन-शख्रियार लढत वगळता अन्य सर्व लढती बरोबरीत सुटल्या. जागतिक क्रमवारीत अग्रस्थानावर विराजमान असलेल्या नॉर्वेच्या कार्लसनने अझरबैजानच्या शख्रियारला ५६ चालींत नामोहरम केले.

अन्य टायब्रेकर लढतींत, फ्रान्सच्या मॅक्सिम वाशिये-लॅग्रेव्हने चीनच्या हाओ वांगला हरवले, तर अमेरिकेच्या वेस्ली सो याने नॉर्वेच्या आर्यन तारीविरुद्ध सरशी साधली. व्हेसेलिन टोपालोव्हने राजाबोव्हविरुद्ध अर्मेगेडनमध्ये आगेकूच केली.

# बीसीसीआय होणार अधिक मालामाल!

## ■ आयपीएल माध्यम हक्कांच्या लिलावातून कोट्यवधींची कमाई

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



जगातील सर्वांत श्रीमंत म्हणून गणले जाणारे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयच्या एकूण कमाईमध्ये इंडियन प्रीमियर लीगमधून (आयपीएल) मिळणार्‍या पैशांचा मोठा वाटा आहे. येत्या रविवारी बीसीसीआयला हजारो कोटी रुपये मिळणार आहेत.

नुकताच आयपीएलचा १५वा हंगाम यशस्वीपणे रंगला. त्यामुळे आता बीसीसीआय पुढील वर्षीच्या आयपीएल तयारीला लागली आहे. रविवारी आयपीएलशी संबंधित एक मोठा निर्णय घेतला जाणार आहे. आयपीएलच्या माध्यम हक्कांचा (मीडिया राईट्स) लिलाव आयोजित केला जाणार आहे. या लिलावातून बीसीसीआयला ६० हजार कोटी रुपयांची घसघशीत कमाई होणार असल्याची चर्चा आहे. आयपीएल माध्यम हक्कांची लिलाव प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. त्यासाठी एम-जंक्शन ई-लिलाव पद्धतीचा वापर होणार आहे.

आयपीएलची लोकप्रियता बघता माध्यमांदेखील यातून भरपूर नफा मिळवण्याची संधी आहे. त्यामुळे सुमारे डझनभर कंपन्यांनी आयपीएल माध्यम हक्क निविदा घेतल्या आहेत. डिस्ने हॉटस्टार, सोनी नेटवर्क, वायाकॉम १८, झी एंटरटेन्मेंट यांसारख्या देशांतर्गत कंपन्यांशिवाय अमेझॉन, ॲपल आणि गुगलसारख्या विदेशी कंपन्याही या लिलाव प्रक्रियेमध्ये स्वारस्य दाखवताना दिसत आहेत. या सर्व कंपन्यांचा पसारा प्रचंड मोठा आहे. त्यामुळे लिलाव प्रक्रियेत भरघोस बोली लागण्याची शक्यता आहे.

२०२३ ते २०२८ या कालवधीसाठी एकूण चार भागांमध्ये आयपीएलचे माध्यम हक्क विकले जाणार आहेत. अशा प्रकारची विक्री पहिल्यांदाच होत आहे. यापूर्वी सर्व हक्क एकत्रितपणे विकले जात होते. डिजिटल माध्यमांच्या वाढीमुळे बीसीसीआयने या वेळी एकाच पॅकेजऐवजी चार वेगवेगळ्या पॅकेजमध्ये हे हक्क विकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी ३२ हजार ८९० कोटी रुपये मूळ किंमत (बेस प्राइस) निश्चित करण्यात आली आहे. म्हणजे या रकमेपासून बोली लागण्यास सुरुवात होईल. ब्रोकरेज फर्म एलारा सिक्युरिटीजने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार बीसीसीआयला या लिलावातून ६० हजार कोटी रुपयांपर्यंतची रक्कम मिळू शकते.

आयपीएल स्पर्धेचा पहिला हंगाम २००८मध्ये खेळवण्यात आला होता. त्यावेळी सोनी कंपनीने त्याच्या प्रसारणाचे हक्क विकत घेतले होते. २००८ ते २०१७ या कालावधीसाठी सोनीने बीसीसीआयला आठ हजार २०० कोटी रुपये मोजले होते. तेव्हा ऑनलाइन प्रक्षेपण नव्हते. यानंतर बीसीसीआयने २०१८ मध्ये पुन्हा माध्यम हक्कांची विक्री केली. या वेळी स्टार स्पोर्ट्स नेटवर्कने त्यांची खरेदी केली होती.

# आकांक्षाची वेटलिफ्टिंगमध्ये आंतरराष्ट्रीय झेप

**मनमाड : प्रतिनिधी**



भुवनेश्वर येथे मार्चमध्ये झालेल्या राष्ट्रीय युथ वेटलिफ्टिंग स्पर्धेत सहा नवीन राष्ट्रीय विक्रमांसह सुवर्णपदक पटकविण्याचा पराक्रम करीत सर्वोत्कृष्ट खेळाडूचा बहुमान पटकावणार्‍या आकांक्षाची आता थेट मेक्सिको येथे होणार्‍या जागतिक युथ वेटलिफ्टिंग या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. अतिशय कमी वयात आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणारी आकांक्षा पहिलीच खेळाडू ठरली आहे.

सुरुवातीला योगाचे प्रशिक्षण घेत शारीरिक व मानसिक क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असतानाच योगाच्या तालुका व जिल्हास्तरीय वयोगटांच्या स्पर्धेत सहभागी होत आकांक्षाने अनेक सुवर्णपदकांची कमाई केली. प्रशिक्षक प्रवीण व्यवहारे यांनी तिचा ११व्या वर्षी या लहान वयातच वेटलिफ्टिंगचा सराव सुरू केला.

सांगली येथे एक १२ व १४ वर्षे वयोगटातील महाराष्ट्रातील व भारतातील पहिलीच राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धा सप्टेंबर २०१८मध्ये झालेल्या आपल्या पहिल्याच स्पर्धेत आकांक्षाने दोन्ही वयोगटांच्या स्पर्धेत ३० किलो वजनी सुवर्णपदक जिंकत वेटलिफ्टिंग खेळात दमदार सुरुवात केली. डिसेंबर २०२१ मध्ये मलकापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत पुन्हा एकदा आकांक्षाने लक्षवेधक कामगिरी करीत ४० किलो युथ मुलींमध्ये सुवर्णपदक व युथ मुलींचा सर्वोत्कृष्ट खेळाडूचा बहुमानही मिळवून भुवनेश्वर येथे होणार्‍या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य वेटलिफ्टिंग संघात स्थान मिळवले.

भारतातील २० सर्वोत्कृष्ट खेळांडूमध्येही आकांक्षाने स्थान पटकावले असून भुवनेश्वर येथे मार्चमध्ये झालेल्या राष्ट्रीय युथ वेटलिफ्टिंग स्पर्धेत आकांक्षाने स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी ४० किलो वजनी गटामध्ये सहा नवीन राष्ट्रीय विक्रमांसह सुवर्णपदक पटकविण्याचा भीम पराक्रम केला, तसेच सर्वोत्कृष्ट खेळाडूचा बहुमान पटकाविला.

# टी-ट्वेंटी सामन्यासाठी बदलले मेट्रोचे वेळापत्रक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान पाच सामन्यांच्या टी-ट्वेंटी मालिकेला गुरुवारी (दि. ९) सुरुवात होत आहे. या मालिकेतील पहिला सामना दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. या सामन्यासाठी दिल्ली मेट्रोनेही आपल्या वेळापत्रकात खास बदल केले आहेत.

दिल्लीतील शेवटच्या मेट्रोची वेळ ९ जून रोजी ५० मिनिटांनी वाढवण्यात आली आहे. सध्या बहुतांश मार्गावरील शेवटची मेट्रो सकाळी ११ वाजेपर्यंतच धावते, मात्र प्रवाशांना सामन्याच्या दिवशी रात्री १२ वाजेपर्यंत मेट्रो मिळेल. अरुण जेटली स्टेडियम हे दिल्ली मेट्रोच्या व्हायलेट लाईनजवळ आहेत. या स्टेडियमच्या सर्वांत जवळ दिल्ली गेट आणि आयटीओ मेट्रो स्थानके आहेत. ही स्थानके काश्मीर गेट ते राजा नाहर सिंगवाली मेट्रोच्या मार्गावर येतात. त्यामुळे सामना संपल्यानंतर जवळच्या मेट्रो स्थानकांवरील प्रवाशांच्या संख्येत मोठी वाढ होऊ शकते. ही बाब लक्षात घेता दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (डीएमआरसी) वेळ वाढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी डीएमआरसीने एक अधिकृत निवेदनही प्रसिद्ध केले आहे. या बदलांमुळे दिल्ली मेट्रो सामन्याच्या दिवशी एकूण ४८ अतिरिक्त फेर्‍या मारणार आहे.









हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., ॲट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, ॲस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✻ E-mail : ramprahar@gmail.com ✻ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

“Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**